कर्नाटक सरकार

शाळा शिक्षण आणि साक्षरता इलाखा

पाठ्यक्रम आधारीत मूल्यमापन सामग्री

2025-26

विषय-विज्ञान

इयत्ता-7वी

राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण संस्था,
बनशंकरी 3 रा टप्पा, बेंगळूरु 560085
जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था मण्णूर, बेळगावी

ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ

ಪಠ್ಯಕ್ರಮ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಮಾಪನ ಸಾಮಗ್ರಿ

2025-26

ವಿಷಯ- ವಿಜ್ಞಾನ

ವರ್ಗ- 7




"ಬದಲಾವಣೆಯ ಶಿಕ್ಷಣ ಭವಿಷ್ಯದ ನಿರ್ಮಾಣ"

ರಾಜ್ಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ,
ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ, ಬೆಂಗಳೂರು - 560085
ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಬೆಳಗಾವಿ

कर्नाटक सरकार

शाळा शिक्षण आणि साक्षरता विभाग

पाठ्यक्रम आधारित मूल्यमापन सामग्री

2025-26

विषय – विज्ञान

इयत्ता – 7वी



राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण संस्था,

बनशंकरी 3 रा टप्पा, बेंगळूरु- 560085

जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था मण्णूर, बेळगावी

Concept and Guidance

Smt. Rashmi Mahesh V, IAS
Principal Secretary to Government
Department of School Education and Literacy

Dr. TRILOK CHANDRA K.V, IAS Commissioner Department of School Education, Bangaluru	**Shri. GOPALKRISHNA H. N.** Director, DSERT Bangaluru

DIET Co-Operation

Shri. BASAVARAJ NALATAWAD **D.D.P.I (Dev) DIET, Belagavi**	**Smt. BHARATI B. DASOG** LBA Nodal, DIET	**Shri. RAVIKUMAR JAVALEKAR** LBA Nodal, DIET

COMPOSITION

Smt. RADHA P.
Senior Assistant Director
DSERT Bangluru

Mentors and Examiners

Smt. VEENA SUTAR Block Resource Person Tq. Khanapur, Dist. Belagavi	**Shri B. A. DESAI** Cluster Resource Person GUNJI, Tq. Khanapur, Dist. Belagavi	**Shri. M. K. PATIL** Cluster Resource Person Bailur, Tq. Khanapur, Dist. Belagavi

Lesson Based Assesment Material Translation Team

Shri. T. B. MORE Govt. Higher Primary School, Khanapur. Tq. Khanapur	**Shri. B. Y. KAMBLE** Govt. Higher Primary School Hadalge. Tq. Khanapur	**Smt. . A. PARAB** Govt. Higher Primary School, Karambal. Tq. Khanapur	**Smt. M. B. SAMBHAJI** Govt. Higher Primary School, Jalage. Tq. Khanapur
Shri. P. B. GAWADE Govt. Higher Primary School, Tivoli. Tq. Khanapur	**Smt. S. S CHOUGULE** Govt. Higher Primary School, Kusamali. Tq. Khanapur	**Smt. SUCHITRA SHIRALKAR** Govt. Higher Primary School, Golyali. Tq. Khanapur	**Smt. S. G. PATIL** Govt. Higher Primary School, Zadnavage. Tq. Khanapur
Smt. A. A. FERNANDES Govt. Higher Primary School, Kirawale. Tq. Khanapur	**Smt. S. D. DESAI** Govt. Higher Primary School , Nagurde. Tq. Khanapur	**Smt. G. V. BHEKANE** Govt. Higher Primary School , Hebbal. Tq. Khanapur	**Smt. T. P. MADHALE** Govt. Higher Primary School , Chapgaon. Tq. Khanapur
Shri. D. N. PATIL Govt. Higher Primary School , Gunji. Tq. Khanapur			

REVIEW TEAM

Shri B. A. DESAI Cluster Resource Person GUNJI, Tq. Khanapur Dist. Belagavi	**Shri. K. S. SHITOLE** Govt. Higher Primary School, Gawali. Tq. Khanapur	**Shri. T. B. MORE** Govt. Higher Primary School, Khanapur. Tq. Khanapur

ಪ್ರಾಸ್ತಾವಿಕ ನುಡಿ





ಆತ್ಮೀಯರೇ,

2025 26 ನೇ ಸಾಲಿನಲ್ಲಿ ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ ಬೆಂಗಳೂರು ಇವರ ನಿರ್ದೇಶನ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನದಂತೆ ಪಾಠ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನದ 4ನೇ , 5 ನೇ , 6 ನೇ , 7 ನೇ ತರಗತಿಯ ಎಲ್ಲ ವಿಷಯಗಳು ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮದಲ್ಲಿ ಒಟ್ಟು 16 ವಿಷಯಗಳ ಪ್ರಶ್ನೆ ಕೋಠಿ ಭಾಷಾಂತರ ಮತ್ತು ನಾಲ್ಕು ವರ್ಗಗಳಿಗೆ ಮರಾಠಿ ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ ಪ್ರಶ್ನೆ ಕೋಠಿ ರಚನೆ ಕಾರ್ಯ ಬೆಳಗಾವಿ ಡಯಟ್ ಗೆ ಹಂಚಿಕೆ ಮಾಡಲಾಗಿದೆ ಅದರಂತೆ ಸಾಹಿತ್ಯ ಸಾಮಗ್ರಿಯನ್ನು ರಚನೆ ಮಾಡಲಾಗಿದೆ.

ತರಗತಿ ಬೋಧನೆಯಿಂದ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಆಗುತ್ತಿರುವ ಬದಲಾವಣೆಗಳು ಮೌಲ್ಯಂಕನ ಕಲಿಕಾ ಫಲ ಆಧಾರಿತವಾಗಿ ನಡೆಯುತ್ತಿದೆ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಮುಂದಿನ ಜಾಗತಿಕದ ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಸ್ಪರ್ಧಿಸಲು ನೆರವಾಗುವಂತೆ ಹಾಗೂ ನಿರಂತರವಾಗಿ ಶಾಲೆಯಲ್ಲಿಯ ಕಲಿಕಾ ಫಲ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಮಾಪನಕ್ಕೆ ಒಳಪಡುವ ಮತ್ತು ಅಗತ್ಯವಿರುವ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯ ಯಶಸ್ವಿಗಾಗಿ ವಿಶಿಷ್ಟ ಆರಂಭದ ಆಶಯದೊಂದಿಗೆ ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ ಮಾರ್ಗದರ್ಶನದ ಅಡಿಯಲ್ಲಿ ಶಿಕ್ಷಕರಿಗೂ ಮತ್ತು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕಾ ಗುಣಮಟ್ಟದ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಅಂದರೆ ಉತ್ತಮ, ಮಧ್ಯಮ, ಸಾಧಾರಣ ಮತ್ತು ಸುಲಭ, ಕಠಿಣ, ಸಾಧಾರಣ ಪ್ರಶ್ನೆ ಕಠಿಣತೆಯ ಮಟ್ಟ ಆಧರಿಸಿ ಎಲ್ಲಾ ಸ್ಥರದ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳನ್ನು ಗಮನದಲ್ಲಿ ಇಟ್ಟುಕೊಂಡು ಬಹು ಆಯ್ಕೆ ಪ್ರಶ್ನೆಗಳು, ಕಿರು ಉತ್ತರ ಪ್ರಶ್ನೆಗಳು, ವಿವರಾಣಾತ್ಮಕ ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಅನ್ವಯಿಕ ಮಾದರಿಯಲ್ಲಿ ಪಾಠ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಪ್ರಶ್ನೆ ಕೋಠಿ ಸಾಹಿತ್ಯ ರಚನೆಯಾಗಿದೆ. ಈ ಸಾಹಿತ್ಯ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಓದು ಬರಹದೊಂದಿಗೆ ಸಂಪೂರ್ಣ ಪಾಠವನ್ನು ಅರ್ಥೈಸಿಕೊಳ್ಳಲು ಅನುಕೂಲವಾಗಿದೆ.

ಪಾಠ ಆಧರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಪ್ರಶ್ನೆ ಕೋಠಿ ಸಾಹಿತ್ಯ ರಚನೆ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ಪ್ರತಿ ಹಂತದಲ್ಲಿ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಮಾಡಿದ ಪಾಠ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ನೋಡಲ ಅಧಿಕಾರಿಗಳು ಡಿ.ಎಸ್.ಇ.ಆರ್.ಟಿ ಬೆಂಗಳೂರು ಉಪನಿರ್ದೇಶಕರು (ಆ) ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ ಬೆಳಗಾವಿ, ಹಿರಿಯ ಉಪನ್ಯಾಸಕರಾದ ಶ್ರೀ ಆಂಜನೇಯಲು ಆರ್ ಕೆ, ಶ್ರೀ ಯು ಡಿ ಹುನಕುಪ್ಪಿ ಶ್ರೀ ಎಸ್. ಡಿ ನದಾಫ್ ಮತ್ತು ವರ್ಗ ವಿಷಯವಾರು ನೋಡಲ ಅಧಿಕಾರಿಗಳಾದ ಎಲ್ಲ ಡಯಟನ ಉಪನ್ಯಾಸಕರು ಖಾನಾಪುರ್, ಬೆಳಗಾವಿ ಗ್ರಾಮೀಣ, ಬೆಳಗಾವಿ ನಗರ , ಬಿ.ಆರ್.ಸಿ , ಬಿ.ಆರ್.ಪಿ, ಸಿ.ಆರ್.ಪಿ, ಸಿ.ಆರ್.ಸಿ ಪಾಠ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನದ ನೋಡಲ ಶ್ರೀಮತಿ ಭಾರತಿ.ಭೀ.ದಾಸೋಗ ಹಾಗೂ ಡಯಟಿನ ಎಲ್ಲಾ ಸಹೋದ್ಯೋಗಿಗಳು ಹಾಗೂ ಶ್ರೀಮತಿ ಶ್ರುತಿ ದುಗ್ಗಾಣಿ, ದ್ವಿದ.ಸ ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿ ಕಾಣಿಸಿಕೊಂಡು ಸಾಹಿತ್ಯ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಸದುಪಯೋಗವಾಗಿ ಸಕಾಲದಲ್ಲಿ ಹೊರಬರಲು ಕಾರಣೀಭೂತರಾಗಿದ್ದಾರೆ. ಈ ಸಾಹಿತ್ಯವು "ಬದಲಾವಣೆಯ ಶಿಕ್ಷಣ ಭವಿಷ್ಯದ ನಿರ್ಮಾಣ" ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ, ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ, ಅನುಷ್ಠಾನ ಅಧಿಕಾರಿಗಳಿಗೆ ಹಾಗೂ ಪೋಷಕರಿಗೆ ಗುಣಾತ್ಮಕ ಶಿಕ್ಷಣ ನೀಡಲು ನೆರವಾಗುತ್ತದೆ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇವೆ.

ಶುಭ ಹಾರ್ಯೆಕೆಗಳೊಂದಿಗೆ,

ಶ್ರೀ ಬಸವರಾಜ. ಎಮ್. ನಾಲತವಾಡ
ಉಪನಿರ್ದೇಶಕರು (ಅ)
ಡಯಟ್ ಬೆಳಗಾವಿ

ಶ್ರೀ ಗೋಪಾಲಕೃಷ್ಣ ಎಚ್ ಎನ್
ನಿರ್ದೇಶಕರು
ಡಿ.ಎಸ್.ಇ.ಆರ್. ಟಿ ಬೆಂಗಳೂರು

अनुक्रमणिका

नील नक्षा

100 गुणांची प्रश्नपत्रिका तयार करत असताना प्रत्येक पाठाला शेकडेवार गुण विभागणी करणे शक्य असते. खाली दिलेली अंदाजित चौकट शेकडेवारीचे प्राधान्य दर्शविते. जी शिक्षक पाठाधारीत मूल्यमापन, प्रकल्प, लेखी मुल्यांकन आणि एकूण मूल्यमापनासाठी वापरू शकतात.

1. उद्दिष्टानुसार शेकडेवार गुण विभागणी

अ. क्र.	उद्दिष्ट्ये	टक्केवारी
1	ज्ञान	25
2	आकलन	30
3	उपयोजन	25
4	कौशल्ये	20
एकूण		100

2. प्रश्नांच्या स्वरूपावरून शेकडेवार गुण विभागणी

अ. क्र.	प्रश्नांचे प्रकार	प्रत्येक प्रश्नासाठी गुण	प्रश्न संख्या	एकूण गुण
1	वस्तुनिष्ठ प्रश्न	1	10	10
2	अति लघु उत्तरे	2	10	20
3	लघु उत्तरे	3	10	30
4	दीर्घ उत्तरे	4 किंवा 5	8	40
एकूण			28	100

3. काठीण्य पातळीनुसार गुण विभागणी

अ. क्र.	प्रश्नाची पातळी	टक्केवारी	गुण
1	सोपे	30 %	30
2	साधारण	50%	50
3	कठीण	20 %	20
एकूण		100 %	100

4. घटकानुसार गुण विभागणी

अ. क्र.	पाठाचे नाव	गुणांची टक्केवारी
1	विज्ञानाचे अद्भुत जग	8
2	सजीवसृष्टीमधील विविधता	8
3	सेवनातील सतर्कता : निरोगी शरीराचा मार्ग	10
4	जाणुया चुंबक	8
5	लांबी व गतीचे मापन	8
6	आपल्या सभोवतालचे पदार्थ	8
7	तापमान आणि त्याचे मापन	8
8	पाण्याच्या अवस्था : स्थित्यंतर	8
9	दैनंदिन जीवनातील वेगवेगळ्या घटकांचे विभाजन	8
10	सजीव: त्यांची वैशिष्ट्ये जाणुया	8
11	निसर्गाचा खजिना	8
12	पृथ्वीच्या पलीकडे	10
	आदर्श उत्तरे	100

टीप : सर्व पाठ सम प्रमाणात विभागले गेले आहेत. जेणेकरून प्रत्येक अध्ययन उद्दिष्टांवर आधारित अचूक मूल्यमापन शिक्षकांना करता येईल. विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या व समजून घेण्याच्या विविध स्तरांचे मूल्यमापन करण्यासाठी बाह्य, उपयोजन आधारित आणि विश्लेषणात्मक प्रश्न CCE प्रक्रियेच्या रचनेनुसार जुळवून घेता येतात.

घटक - 1

वनस्पतींचे पोषण

- **अध्ययन निष्पत्ती -**

1. वनस्पतींतील पोषणाच्या पद्धती स्पष्ट करतात.

2. पोषणाचा अर्थ स्पष्ट करतात.

3. वनस्पतींतील पोषणाचे प्रकार ओळखतात.

4. हिरव्या वनस्पतींमध्ये अन्न तयार करण्यासाठी प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया स्पष्ट करतात.

5. वनस्पतींमध्ये पोषणासाठी आवश्यक असलेले मूलभूत घटक ओळखतात.

6. परपोषी वनस्पतींची उदाहरणे देतात.

7. प्रायोगिक कृतीद्वारे प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेचे सादरीकरण करतात.

8. पर्यावरणात वनस्पतींची भूमिका ओळखतात.

1. खालीलपैकी प्रत्येकासाठी दिलेल्या चार पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा:

1.पाणी, कार्बन डायऑक्साइड आणि खनिजे वापरून अन्न तयार करू शकणारे जीव हे आहेत

A. वनस्पती B. प्राणी

C. पक्षी D. मानव (सोपे)

2. वनस्पतींचे अन्न कारखाने हेआहेत:

A. मूळ B. खोड

C. पाने D. फुले (सोपे)

3. प्रकाश संश्लेषणा दरम्यान निर्माण होणारा वायू म्हणजे:

A. हैड्रोजन B. नैट्रोजन

C. कार्बन डायऑक्साइड D.ऑक्सिजन (सरासरी)

4. पानातील क्लोरोफिलद्वारे शोषली जाणारी ऊर्जा:

A. सौर ऊर्जा B. जल ऊर्जा

C. पवन ऊर्जा D. स्नायू ऊर्जा (सोपे)

5. परपोषी वनस्पतीचे उदाहरण:

A. कस्कुटा B. हैड्रा

C. यीस्ट D. पॅरामेशियम (सोपे)

6. प्रकाश संश्लेषणाद्वारे स्वतःचे अन्न स्वतः तयार करणारी वनस्पती:

A. आळंबी B. बुरशी

C. यीस्ट D. शेवाळ (सोपे)

7. पानांमध्ये असलेले रंगद्रव्य:

A. क्लोरोफिल (हरित द्रव्य) B. स्टोमॅटा

C. खनिजे D. क्षार (सोपे)

8. आळंबी मधील पोषणाचा प्रकार:

A. परोपजीवी पोषण B. शवोपजीवी पोषण

C. स्वयंपोषी पोषण D. प्रकाशसंश्लेषण (सोपे)

9. यजमान वनस्पतीपासून उपयुक्त पोषक तत्वं घेणाराजीव:

A. हैड्रा B. यीस्ट

C. कस्कुटा D. पॅरामेशियम (सोपे)

10. किटकभक्षी वनस्पतीचे उदाहरण:

A. गुलाब B.जास्वंदी

C. घटपर्णी D. सूर्यफूल (सोपे)

11. मृत आणि कुजणाऱ्या पदार्थांपासून जीवजंतू पोषकद्रव्ये मिळवण्याची पद्धत ही आहे:

A. शवोपजीवी पोषण B. बुरशी

C. परोपजीवी D. स्वयंपोषी (सोपे)

12. आहार पिके सामान्यतः मोठ्या प्रमाणात शोषून घेतात तो अंश:

A. हैड्रोजन B. नैट्रोजन

C. कार्बन D. ऑक्सिजन (सोपे)

13. वातावरणातील नैट्रोजन शोषण्यास मदत करणारा जीवाणू:

A. रायझोबियम B. क्लोरोफिल

C. रायबोसोम D. सायटोप्लाझम (सोपे)

14. प्रकाश संश्लेषण समीकरण पूर्ण झाल्यावर: कार्बन डायऑक्साइड + पाणी ---› [ ] + ऑक्सिजन

A. प्रोटीन्स B. कार्बोहैड्रेट्स

C. जीवनसत्व D. फॅट्स (सोपे)

15. चूक की बरोबर ओळखा:

A. प्रकाश संश्लेषणाशिवाय आहार उपलब्ध होणार नाही. (सोपे)

B. मनुष्यआणि प्राणी अन्नासाठी वनस्पतींवर अवलंबून असतात. (सोपे)

C. प्रकाश संश्लेषणात ऑक्सिजन तयार होतो. (सोपे)

16. स्वतःचे अन्न स्वतः तयार करणाऱ्या वनस्पती:

A. परपोषी B. स्वयंपोषी

C. शवोपजीवी D. कीटकभक्षी वनस्पती (सोपे)

17. वनस्पतींद्वारे संश्लेषित केलेले अन्न हे या स्वरूपात असते.

A. स्टार्च B. प्रथिने

C. व्हिटॅमिन D. फॅट्स (सोपे)

18. प्रकाश संश्लेषणात सौरऊर्जा मिळवणारे रंगद्रव्य म्हणजे:

A. हिरवे रंगद्रव्य B. लाल रंगद्रव्य

C. तपकिरी रंगद्रव्य D. जांभळे रंगद्रव्य (सोपे)

19. वनस्पती प्रकाश संश्लेषणात ----------- चा उपयोग करून ------------- मुक्त करतात

A.ऑक्सिजन आणि हैड्रोजन B. नैट्रोजन आणि ऑक्सिजन

C. हैड्रोजन आणि ऑक्सिजन D. कार्बन डायऑक्साइड आणि ऑक्सिजन (सोपे)

20. सजीवांचा मूलभूत घटक:

A. ऊती B. पेशी

C. अवयव D.अवयव प्रणाली (सोपे)

21. वनस्पती ज्या सूक्ष्म रंध्रातून कार्बन डायऑक्साइड शोषतात ते रंध्र:

A. पर्णरंध्र B. खोड

C. मूळ D. फूल (सोपे)

22. वनस्पतीच्या ज्या भागातून सर्वात जास्त वायूची देवाणघेवाण होते तो भाग:

A. मूळ B. पाने

C. खोड D. फूल (सोपे)

23. प्रकाश संश्लेषणक्रिया घडून येणारा भाग:

A.खोड B. मूळ

C. पान D. फळ (सोपे)

24. हिरव्या खोडामध्ये प्रकाश संश्लेषण करणाऱ्या वनस्पती येथे आढळतात

A.वाळवंट B. दलदल

C. पर्वत D. हिमालयीन पर्वत (सरासरी)

25. वाळवंटातील वनस्पतींमध्ये पाण्याचे नुकसान या प्रक्रियेद्वारे होते:

A. अपवर्तन B. बाष्पीभवन

C. पचनक्रिया D. वाष्पोत्सर्जन (सरासरी)

26. प्रकाश संश्लेषणात वनस्पतीचा हा भाग कार्बन डायऑक्साइड शोषून घेतो

A. मुळांचे केस B. पर्णरंध्र

C. पानांच्या शिरा D. पाकळ्या (सोपे)

27. यापैकी, किटकांना पकडून खाणारी किटकभक्षी वनस्पती:

A. कस्कुटा B. घटपर्णी

C. जास्वंदी D. गुलाब (सोपे)

28. अंशतः स्वयंपोषी वनस्पती

A.शेवाळ B. बुरशी

C. जीवाणू D. विषाणू (सोपे)

II. स्तंभ A आणि स्तंभ B जुळवा: (सरासरी)

29 .

A	B
1. क्लोरोफिल	A. परपोषी वनस्पती
4.ऑक्सिजन	B. हिरव्या वनस्पतींमध्ये आढळणारे रंगद्रव्य
3. कस्कुटा	C. श्वसनासाठी आवश्यक वायू
4. प्रकाश संश्लेषण	D. हवेतून वनस्पतींना उपयुक्त
5. नैट्रोजन स्थिरीकरण	E. अन्न तयार करण्याची प्रक्रिया

30.

A	B
1. प्रकाश संश्लेषण	A. हिरवे रंगद्रव्य
2. घटपर्णी	B. परपोषी वनस्पती
3. क्लोरोफिल	C. अन्न तयार करणे
4. कस्कुटा	D. किटकभक्षी वनस्पती

III. खालील शब्दांशी संबंधित तीन शब्दांची यादी करा:

31. हिरव्या वनस्पती (सरासरी)
32. परपोषी वनस्पती (सरासरी)
33. अन्न तयार करण्यासाठी आवश्यक असलेले घटक (सरासरी)

IV. योग्य उत्तरांसह रिकाम्या जागा भरा:

34. प्रकाश संश्लेषणा दरम्यान, वनस्पती __________ वायू वापरतात. (सोपे)

35. हिरवा रंग नसलेल्या परपोषी वनस्पतीचे उदाहरण _______ आहे:. (सोपे)

36. प्रकाश संश्लेषणात अन्न तयार होताना मिळणारे उत्पादन _________ आहे. (सोपे)

37. प्रकाश संश्लेषणासाठी सूर्याची __________ आवश्यक आहे. (सोपे)

38. हिरव्या वनस्पती __________ प्रक्रियेद्वारे त्यांचे अन्न तयार करतात. (सोपे)

39. वनस्पतींना हिरवा रंग देणारे रंगद्रव्य __________ आहे. (सोपे)

40. कस्कुटा ही __________ वनस्पती आहे. (सोपे)

V. खालील विधाने सत्य आहेत की असत्य ते सांगा:

41. हिरव्या वनस्पती प्रकाश संश्लेषणाद्वारे स्वतःचे अन्न तयार करतात. (सोपे)

42. घटपर्णीही एक स्वयंपोषी वनस्पती आहे. (सरासरी)

43. प्रकाश संश्लेषणासाठी कार्बन डायऑक्साइडची गरज नाही. (सोपे)

44. क्लोरोफिल सूर्यप्रकाश शोषण्यास मदत करते. (सोपे)

45. सर्व वनस्पती हिरव्या रंगाच्या असतात. (सरासरी)

46. सर्व वनस्पती प्रकाश संश्लेषण करतात. (सरासरी)

47. कस्कुटा ही एक परपोषी वनस्पती आहे. (सोपे)

48. प्रकाश संश्लेषणात ऑक्सिजनचा वापर केला जातो. (सोपे)

49. वनस्पती सूर्यप्रकाशात त्यांचा आहार तयार करतात. (सोपे)

VI. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

50. वनस्पती अन्न तयार करण्यासाठी कोणत्या वायूचा वापर करतात? (सोपे)

51. प्रकाश संश्लेषणातील उपउत्पादन लिहा. (सोपे)

52. कस्कुटा ही हिरवी वनस्पती आहे – बरोबर की चूक सांगा. (सोपे)

53. घटपर्णी ही कोणत्या प्रकारची वनस्पती आहे? (सोपे)

54. सहजीवी संबंध म्हणजे काय? (सरासरी)

55. शवोपजीवी पोषण म्हणजे काय? (सरासरी)

56. किटकभक्षी वनस्पतींची उदाहरणे द्या. (सोपे)

57. दगडफूलामध्ये पोषण कसे होते? (कठीण)

58. कोणते जीवाणू वनस्पतींना नैट्रोजन शोषण्यास मदत करतात? (सोपे)

59. शेवाल हिरव्या रंगाचे का असते? (सोपे)

VII. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यांमध्ये द्या (संक्षिप्त उत्तर – 2 गुण):

60. प्रकाश संश्लेषण म्हणजे काय? (सरासरी)

61. क्लोरोफिलची भूमिका काय आहे? (सरासरी)

62. कस्कुटा परपोषी का आहे ? (सरासरी)

63. 'क्लोरोफिल' हा शब्द स्पष्ट करा. (सरासरी)

64. प्रकाश संश्लेषणासाठी आवश्यक असलेले चार घटक सांगा. (सरासरी)

65. वनस्पतींना 'स्वयंपोषी ' का म्हणतात ते स्पष्ट करा. (सरासरी)

66. कस्कुटाला हिरवा रंग का नाही? (सरासरी)

VIII. खालील प्रश्नांची उत्तरे तीन-चार वाक्यांमध्ये द्या (संक्षिप्त उत्तर – 3 गुण):

67. प्रकाश संश्लेषणासाठी आवश्यक घटक आणि उत्पादनांची यादी करा. (सरासरी)

68. स्वयंपोषी आणि परपोषी वनस्पतींमधील फरक लिहा. (सरासरी)

69. काही वनस्पती हिरव्या नसतानाही जगतात. हे कसे शक्य आहे? उदाहरण देऊन स्पष्ट करा. (कठीण)

70. प्रकाश संश्लेषणात प्रकाशाची भूमिका स्पष्ट करा. (सरासरी)

IX. खालील प्रश्नांची उत्तरे चार-पाच वाक्यांमध्ये द्या (लघु उत्तर – ४ गुण):

71. प्रकाश संश्लेषणाची क्रिया स्पष्ट करा. (सरासरी)

72. घटपर्णी वनस्पतीच्या पोषणाचे विवरण करा. (कठीण)

73. कस्कुटा ही एक परपोषी वनस्पती आहे याचे समर्थन करा. (कठीण)

74. प्रकाश संश्लेषणात प्रकाशाची भूमिका वैज्ञानिकदृष्ट्या स्पष्ट करा. (कठीण)

75. किटकभक्षी वनस्पती त्यांचे पोषण कसे करतात हे उदाहरणासह स्पष्ट करा. (कठीण)

X. खालील प्रश्नांची उत्तरे द्या: (पाच गुणांचे प्रश्न:)

76. प्रकाश संश्लेषणाची क्रिया आकृतीसह स्पष्ट करा. (कठीण)

77. जर प्रकाश संश्लेषण झाले नाहीतर, पृथ्वीवरील सजीवांवर काय परिणाम होईल? (कठीण)

78. जर तुम्ही घटपर्णी वनस्पती असाल तर, तुमचे जीवनचक्र कसे असेल? स्पष्ट करा. (कठीण)

79. वनस्पती आहार उत्पादक आणि पर्यावरणाचे रक्षक आहेत" हे विधान स्पष्ट करा. (कठीण)

80. मानवी जीवन प्रकाश संश्लेषणावर अवलंबून असते, याचे समर्थन करा. (कठीण)

पाठ-2

प्राण्यांचे पोषण

*अध्ययन निष्पत्ती:

1. प्राण्यांमधील पोषणाचे टप्पे स्पष्ट करतात.

2. मानवातील अन्नपचनाची प्रक्रिया स्पष्ट करतात.

3. अमिबा सारख्या एकपेशीय सजीवांमधील पोषण पद्धती समजून घेतात.

I. पुढील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्यायांपैकी योग्य उत्तर निवडा (1 गुण)

1. प्राण्यांमधील पोषणामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

   A. पोषक घटकांची आवश्यकता
   B. अन्न घेण्याची पद्धत
   C. शरीरामध्ये त्याचा उपयोग
   D. वरील सर्व (सोपे)

2. मिश्राहारी प्राणी खालील प्रकारचे प्राणी खाऊन अन्न मिळवतात.

   A. मांसाहारी
   B. शाकाहारी
   C. मिश्राहारी
   D. वरील सर्व. (सोपे)

3. खालील अन्नघटक संकीर्ण पदार्थ आहेत.

   A. कार्बोहायड्रेट्स
   B. लिपिड्स
   C. जीवनसत्वे
   D. वरील सर्व (सोपे)

4. शरीराचा असा अवयव (भाग) जिथे सर्व अन्न घटकांचे पचन पूर्ण होते.

   A. लहान आतडे
   B. मोठे आतडे
   C. जठर
   D. यकृत. (सोपे)

5. आपल्या शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी ही आहे.

   A. जठर
   B. हृदय
   C. यकृत
   D. मेंदू (सोपे)

6. i पचन ii एकजीव होणे iii अंतर्ग्रहण iv उत्सर्जन v अभिशोषण

या पोषणाच्या टप्प्यांचा योग्य क्रम __________

A. I , ii, iii, iv v
B. iii, i ,ii ,,v, iv
C. iii, i, v, ii, iv
D. iii, ii, i , v ,iv (मध्यम)

7. रवंथ करणाऱ्या प्राण्यांच्या पचनसंस्थेतील असा भाग जिथे खाल्लेले अन्न साठवले जाते.

A. शोषणेंद्रिये
B. अन्ननलिका
C. रुमेन
D. तोंड (सोपे)

8. अमिबाला अन्न मिळवण्यासाठी आणि हालचालीसाठी मदत करणारा भाग;

A. छद्मपाद
B. अन्नविवर (अन्नपोकळी)
C. केंद्र
D. D. कलकणू (सोपे)

9. आपण गवत पचवू शकत नाही. कारण त्यामध्ये हे असते.

A. सुक्रोज
B. ग्लुकोज
C. फ्रुक्टोज
D. सेल्युलोज (मध्यम)

10. लहान आतड्यामध्ये असलेल्या शोषणेंद्रियांचे मुख्य कार्य हे आहे.

A. शोषण
B. अंतर्ग्रहण(अन्न घेणे)
C. उत्सर्जन
D. पचन (सोपे)

11) आपल्या जठरातील आम्ल,

A. पोटाच्या आतील आवरणाचे हानिकारक पदार्थांपासून संरक्षण करते.
B. अन्नासोबत जठरात आलेल्या अनेक हानिकारक जीवाणूंना मारते.
C. जठरात अन्न शोषून घेते.
D. जठरातील प्रथिनांचे पचन करते. (मध्यम)

12) लहान आतड्यांच्या आतील भित्तीकेवर (आंतस्त्वचेवर) हजारों बोटांसारखे वाढलेले भाग असतात. त्यांना असे म्हणतात.

A. शोषणेंद्रिये (व्हिल्ली)
B. आतडे
C. जठर
D. रक्तवाहिन्या (सोपे)

13) वयाच्या 6 ते 8 वर्षांदरम्यान गळून पडणारे दात म्हणजे

A. कायमचे दात
B. दुधाचे दात
C. जबड्याचे दात/दाढा
D. सुळे (मध्यम)

14) पोटामध्ये हैड्रोक्लोरिक आम्ल व ______ रस अन्नाशी प्रक्रिया करतो.

A. पाचक
B. पित्त
C. ऑक्सिजन
D. कार्बन (सोपे)

15) अमिबामध्ये अन्नाचे पचन करणारा भाग हा आहे.

A. पेशीद्रव (सायटोप्लाझम)
B. विवरे/रिक्तीका (व्हॅक्युअल)
C. पेशीपटल
D. केंद्र (सोपे)

16) जे सजीव झाडांपासून तयार झालेले अन्न घेतात ते ___________असतात.

A. परपोषी
B. स्वयंपोषी
C. स्वयंनिर्भर पोषण
D. संरक्षक पेशी (सोपे)

17) मानवी शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी ही आहे.

A. स्वादुपिंड
B. यकृत
C. जठर
D. मेंदू (सोपे)

18) खालील घटक जुळवा.

1. उर्जा (i) अमिनो आम्ले
2. कार्बो हैड्रेट्स (ii) साखर
3. प्रोटीन्स (iii) फॅटी ॲसीड आणि ग्लिसरॉल
4. फॅट्स (iv) श्वसन क्रियेतील उत्पादन

A. 1-(i), 2-(ii), 3-(iii), 4-(iv)
B. 1-(ii), 2-(iii), 3-(i), 4-(iv)
C. 1-(iv), 2-(ii), 3-(iii), 4-(i)
D. 1-(iv), 2-(i), 3-(ii), 4-(iii) (कठीण)

19) पित्तरस येथे तयार होतो.

A. मेंदू
B. हृदय
C. यकृत
D. तोंड (सोपे)

20) पचनसंस्थेतील कोणता भाग कोणत्या कार्यात सामील आहे.ते जुळवा.

1. अन्नाचे अभिशोषण	(i) दात
2. अन्न चावणे	(ii) लहान आतडे
3. जीवाणूंना मारणे	(iii) मोठे आतडे
4. अन्नाचे संपूर्ण पचन	(iv) हैड्रोक्लोरिक आम्ल.
5. मल तयार होणे	(v) लहान आतडे.

A. 1-i, 2-ii, 3-iii, 4-iv, 5-v
B. 1-v, 2-i, 3-iv, 4-ii, 5-iii
C. 1-iii, 2-i, 3-ii, 4-iv 5-v
D. D. 1-ii, 2-v, 3-i, 4-iii, 5-iv (कठीण)

21) पचन न झालेले अन्न येथे साठवले जाते.

A. मोठे आतडे
B. मलाशय
C. लहान आतडे
D. जठर (सोपे)

22) पचन येथे पूर्ण होते.

A. मोठे आतडे
B. यकृत
C. जठर
D. लहान आतडे (सोपे)

23) पचन क्रियेमध्ये पाणी शोधून घेणारा अवयव

A. जठर
B. यकृत
C. मोठे आतडे
D. लहान आतडे (सोपे)

24) पित्तरस तयार करणारा शरीरातील अवयव

A. जठर
B. हृदय
C. यकृत
D. मेंदू (सोपे)

25) रवंथ करणाऱ्या प्राण्यांच्या अंधनाळ / अंधात्र येथे आढळणारा एकपेशीय सजीव

A. अमिबा
B. युग्लिना
C. जीवाणु
D. पॅरामोशियम (मध्यम)

26) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

A. स्टार्चचे पचन जठरात सुरु होते. (सोपे)
B. जीभ लाळेसोबत अन्न मिसळायला मदत करते. (सोपे)
C. रवंथ करणारे प्राणी गिळलेले गवत पुन्हा तोंडात आणून कांहीवेळ चावत राहतात.
D. पित्ताशय पित्तरस तात्पुरते साठवून ठेवतो. (सोपे)

27) दिलेल्या वाक्यासाठी योग्य शब्द लिहा.

A. फॅट्सचे (स्निग्ध पदार्थांचे) येथे पूर्ण पचन होते. (सोपे)
B. न पचलेल्या अन्नातील पाणी मुख्यत: येथे शोषले जाते.

II) पुढील प्रश्नांची एका शब्दात किंवा एका वाक्यात उत्तरे द्या. (1 गुण)

28) शाकाहारी प्राणी म्हणजे काय? (सोपे)

29) मांसाहारी प्राणी म्हणजे काय? (सोपे)

30) ससा शाकाहारी आहे का? स्पष्ट करा. (मध्यम)

31) पचन म्हणजे काय? (सोपे)

32) झाडांच्या फुलांमधून मध शोषणाऱ्या दोन कीटकांची नावे सांगा. (मध्यम)

33) हमिंगबर्ड कोणत्या प्रकारचे अन्न खातो.? (मध्यम)

34) अंतर्ग्रहण म्हणजे काय? (सोपे)

35) मिश्राहारी प्राण्याचे एक उदाहरण द्या. (सोपे)

36) अस्वल मिश्राहारी आहे का? का? (सोपे)

37) मानवातील पोषणाचे प्रमुख टप्पे कोणते? (मध्यम)

38) लाळ स्त्रवणारी ग्रंथी कोणती? (सोपे)

39) दातांचे चार प्रकार कोणते? (सोपे)

40) मानवी शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी कोणती? (सोपे)

41) मानवी पचन संस्थेतील 'J' आकाराचा पिशवीसारखा भाग कोणता आहे? (मध्यम)

42) अभिशोषण म्हणजे काय? (सोपे)

43) यकृतामध्ये स्त्रवणाऱ्या संप्रेरकाचे (एन्झाइमचे) नांव काय? (मध्यम)

44) स्निग्ध पदार्थांच्या (फॅट्सच्या) पचनात मुख्य भूमिका बजावणाऱ्या भागाचे नांव काय? (मध्यम)

45) शोषणेंद्रिये म्हणजे काय? (सोपे)

46) स्निग्ध पदार्थांचे (फॅट्सचे) संपूर्ण पचन होणारा पचनसंस्थेतील मुख्य भाग कोणता? (मध्यम)

47) मानवी जठरामध्ये स्त्रवणाऱ्या आम्लाचे नांव काय? (सोपे)

48) मानवाच्या पचनसंस्थेतील लहान आतडे व मोठे आतडे यांची लांबी किती असते ? (मध्यम)

49) मानवाच्या पचन संस्थेतील अन्ननलिकेची लांबी किती असते? (मध्यम)

50) अन्ननलिकेचे मुख्य कार्य काय आहे? (मध्यम)

51) मलविसर्जन म्हणजे काय? (सोपे)

52) मानवाच्या शरीरातील तांबूस-तपकिरी ग्रंथी कोणती? (मध्यम)

53) गवत खाणाऱ्या प्राण्यांना दुसऱ्या कोणत्या नांवाने ओळखले जाते? (सोपे)

54) गवत खाणाऱ्या प्राण्यांच्या पचनसंस्थेतील खास भागाचे नांव काय आहे? (सोपे)

55) 'रवंथ करणारे प्राणी' असे कोणत्या प्राण्यांना म्हणतात? उदाहरणे द्या. (सोपे)

56) रवंथ करणाऱ्या प्राण्यांमध्ये लहान आतडे व मोठे आतडे यामधील पिशवीसारख्या रचनेला काय म्हणतात? (सोपे)

57) मानवाला सेल्युलोजचे पचन करता येते का? (सोपे)

58) सूक्ष्मजीव म्हणजे काय? (सोपे)

59) एकपेशीय सजीव म्हणजे काय? (सोपे)

60) अमिबामध्ये अन्नाचे पचन कोठे होते? (सोपे)

61) गडबडीने अन्न खात असताना गिरीषला अचानक उचक्या लागतात. ह्याचे स्पष्टीकरण तुम्ही कसे कराल? (मध्यम)

62) 'सूक्ष्मदर्शक' म्हणजे काय? (सोपे)

III. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे द्या. (2 गुण)

63) प्राण्यांमधील पोषण म्हणजे काय? त्याचे दोन मुख्य उद्देश सांगा. (मध्यम)

64) पचन म्हणजे काय? प्राण्यांमधील पचनाचे मुख्य टप्पे कोणते? (कठीण)

65) रवंथ म्हणजे काय? या प्रकारच्या प्राण्यांमध्ये अन्न कोठे साठवले जाते? (मध्यम)

66) जीभेचे कार्य काय आहे? (सोपे)

67) पचनामध्ये सहभागी विविध अवयव कोणते आहेत? (मध्यम)

68) शोषणेंद्रियांचे कार्य काय आहे? स्पष्ट करा. (मध्यम)

69) 'पचन' अन्नघटकांचे साध्या पदार्थांमध्ये रुपांतर करते. हेअन्नघटक कोणते? (कठीण)

70) अमिबाची आकृती काढा, व त्यांच्या दोन भागांना नावे द्या. (सोपे)

71) नांवे लिहा.

A. एकपेशीय सूक्ष्मजीव (सोपे)
B. रवंथ करणारे प्राणी (सोपे)
C. अमिबाचा हालचालीचा अवयव (सोपे)
D. गवतातील एक प्रकारचा कार्बोहायड्रेट (मध्यम)
E. अन्न चावणे (सोपे)
F. अन्नाची चव ओळखणे. (सोपे)
G. अन्नातील जीवाणू मारण्यास मदत करणारा घटक (मध्यम)
H. पित्तरस स्त्रवणारा अवयव (सोपे)
I. लहान आतड्यांमध्ये पोषकतत्त्वांचे शोषण करणारा घटक (मध्यम)
J. मलविसर्जनाला मदत करते.

IV खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यात उत्तरे द्या. (3 गुण)

72) पचनसंस्थेतील कोणता भाग अभिशोषणाच्या प्रक्रियेत सहभागी होतो? (कठीण)

73) चार प्रकारचे दात दर्शविणारी आकृती काढा.नांवे द्या. (कठीण)

74) मानवी पचनसंस्थेची आकृती काढून भागांना नांवे द्या. (कठीण)

75) रवंथ करणाऱ्या प्राण्यांच्या पचन संस्थेची आकृती काढा, नांवे द्या. (कठीण)

76) मानवाच्या पोषणाच्या टप्प्यांचा प्रवाही तक्ता काढा . (अंतर्ग्रहण, पचन, अभिशोषण, एकजीव होणे, मलविसर्जन) (कठीण)

पाठ 3
उष्णता

अध्ययन निष्पत्ती:

1. उष्णता आणि तापमान यातील फरक समजावून सांगतात.

2. पदार्थांचे तापमान, उष्णतेचा प्रवाह, गती समजून घेतात.

3. विविध साधनांच्या साहाय्याने तापमान मोजण्याच्या पद्धती ओळखतात.

प्रश्न-

I. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

1. खालील परिस्थितीत काय होईल ते सांगा:

50°C तापमान असणारा लोखंडाचा गोळा, 25°C तापमान असणा-या पाण्यात बुडविल्यास उष्णता …

A. लोखंडाच्या गोळ्या कडून पाण्याकडे वाहते .

B. लोखंडाच्या गोळ्या कडून पाण्याकडे किंवा पाण्याकडून लोखंडाकडे वाहत नाही .

C. पाण्यातून लोखंडाच्या गोळ्या कडे वाहते

D. दोन्हीच्या तापमानामध्ये वाढ होते. (सोपे)

2. स्टेनलेस स्टीलचे भांडे सामान्यत: तांब्याचा तळ असलेले किंवा तांब्याचे आवरण असलेले असते, कारण—

A. तांब्याचा तळ भांड्याला अधिक टिकाऊ बनवतो.

B. असे भांडे आकर्षक दिसावे म्हणून तयार केले जाते.

C. तांबे हा स्टेनलेस स्टीलपेक्षा चांगला उष्णता वाहक आहे.

D. तांबे स्टेनलेस स्टीलपेक्षा स्वच्छ करणे सोपे असते. (सरासरी)

3. उन्हाळ्यात हलक्या रंगाचे कपडे जास्त वापरण्याचे कारण—

A. रंगीत कापड सफेद कापडापेक्षा जास्त उष्णता शोषते

B. रंगीत कापड कमी उष्णता शोषते

C. रंगीत कपडे आणि सफेद कपडे सारखीच उष्णता शोषतात

D. वरीलपैकी काहीही नाही (सरासरी)

4. पदार्थाच्या तापमानाच्या पातळीचे मापन—

A. तापमान

B. घनता

C. कॅलरी

D. वजन (सोपे)

5. उकळत्या पाण्याचे तापमान मोजण्यासाठी वापरले जाणारे उपकरण—
A. क्लिनिकल थर्मामीटर
B. प्रयोगशाळा थर्मामीटर
C. हवामान थर्मामीटर
D. वरील पैकी कोणतेही नाही (सोपे)

6. रहीम आणि राजू आपल्या शरीराचे तापमान थर्मामीटरने मोजतात आणि अनुक्रमे 98.6°F आणि 37°C आढळते या संदर्भात—
A. रहीमच्या शरीराचे तापमान राजूपेक्षा जास्त आहे
B. राजूच्या शरीराचे तापमान रहीमपेक्षा जास्त आहे
C. दोघांच्या शरीराचे तापमान सारखेच आहे
D. दोघांच्या शरीराचे तापमान समान नाही (सरासरी)

7. सामान्यतः उष्णता जास्त तापमान असणाऱ्या वस्तू कडून .... असणाऱ्या वस्तूकडे वाहते
A. समान तापमान
B. जास्त तापमान
C. कमी तापमान
D. कोणतेही नाही (सोपे)

8. खालीलपैकी कोणता उष्णतेचा मंद वाहक आहे ?
A. स्वयंपाकाचे तेल
B. लोखंडी रॉड
C. पाणी
D. तांब्याची वायर (सोपी)

9. हल्लीच्या काळातील घरांची निर्मिती करताना काच, POP (प्लास्टर ऑफ पॅरिस), कॉंक्रीट, सिमेंट यांचा अधिक वापर केला जातो. यामागचे कारण काय आहे?

A. घर मजबूत करण्यासाठी

B. घर सजवण्यासाठी

C. आग लागल्यास घराचे संरक्षण करण्यासाठी

D. बांधकाम खर्च कमी करण्यासाठी (सरासरी)

10. फार उंच इमारतींमध्ये वायुवीजन (Ventilation) यंत्रणा का असते?

A. सजावटीसाठी

B. फक्त प्रकाशासाठी

C. इमारत थंड ठेवण्यासाठी

D. वरीलपैकी काहीच नाही (सोपी)

11. खालीलपैकी कोणती उष्णता संक्रमण करण्याची पद्धत नाही.

A. वहन (Conduction)

B. अभिसरण (Convection)

C. उत्सर्जन (Radiation)

D. प्रसरण (Expansion) (सोपी)

12. जेव्हा तवा आगीतून काढला जातो, तेव्हा तो हळूहळू थंड होतो. याचे कारण काय?

A. तव्यापासून सभोवतालच्या भागात उष्णतेचे संक्रमण

B. सभोवतालच्या भागातून तव्यामध्ये उष्णतेचे संक्रमण

C. उष्णतेचा संक्रमणाचा अभाव

D. कोणतेही नाही (सरासरी)

13. धातूच्या तव्याला प्लास्टिक किंवा लाकडी हँडल का लावतात?

A. धरायला सोयीस्कर

B. दीर्घकालीन टिकाऊपणा

C. वजन वाढवण्यासाठी

D. तव्याची उष्णतेने हात भाजू नये म्हणून (सरासरी)

14. खालील पैकी कोणत्या कारणांनी दुचाकीचा सायलेंसर गरम होते

A. अभिसरण (Convection)

B. वहन (Conduction)

C.उत्सर्जन (Radiation)

D. प्रकाशीय बदल ((Light Effect) (सरासरी)

15. खालीलपैकी कोणती सामग्री उष्णता सहजपणे वाहून नेते?

A. विटा B. लाकडी तुकडा

C. काच D. ॲल्युमिनियम (सोपे)

16. किनारपट्टी भागात घरांची खिडकी समुद्राच्या विरुद्ध दिशेला का असते?

A. नैसर्गिक प्रकाश चांगल्या प्रकारे मिळावा

B. समुद्राच्या दिशेने येणारा वारा येण्यासाठी

C. जमिनीच्या दिशेने येणारा वारा यावा

D. घर बनवण्याचा खर्च कमी करण्यासाठी (सरासरी)

17. समुद्री वारे किंवा खारे वारे म्हणजे काय?

A. समुद्रावर असलेला वारा

B. समुद्राकडून जमिनीवर येणारा वारा

C. जमिनीवरून समुद्राकडे जाणारा वारा

D. पृथ्वीवरील वारा (सरासरी)

18. दिवसा खारे वारे का वाहतात ?

A. दिवसा वारा जोरात वाहतो

B. तापमान दिवसा वाढते

C. पृथ्वी समुद्रापेक्षा लवकर तापते

D. समुद्र जमिनीपेक्षा लवकर तापतो (सरासरी)

19. सूर्यापासून निघालेली उष्णता पृथ्वी पर्यंत पोहचण्याची प्रक्रिया.

A. वहन

B. अभिसरण

C. उत्सर्जन

D. कोणतेही नाही (सोपे)

20. द्रव पदार्थ गरम करण्यासाठी सामान्यतः कोणती पद्धत वापरली जाते?

A. वहन


B. अभिसरण

C. उत्सर्जन

D. कोणतेही नाही (सोपे)

21. दिलेल्या चित्रात दाखवलेल्या उष्णतेच्या संक्रमण पद्धतीचे नाव सांगा:

(सूर्यकिरण कपड्यांवर पडत आहेत)



A. वहन

B. अभिसरण

C उत्सर्जन

D. बाष्पीभवन (कठीण)

22. अशी उष्णतेची संक्रमण पद्धत जी माध्यमाशिवाय होते:

A. वहन

B. अभिसरण

C. उत्सर्जन (सोपे)

D. सर्व वरील

23. मेणबत्तीच्या ज्योतीचा वरचा भाग सर्वात जास्त गरम असतो, कारण:

A. वरच्या दिशेने उष्णतेचे अभिसरण


B. खालील दिशेने अभिसरण

C. उष्णतेचे वहन

D. उत्सर्जन (सोपे)

24. खालील चित्रातील उष्णता संक्रमण पद्धत ओळखा:

(समुद्रकिनारी दिवसा होणारी हवेची हालचाल दाखवली आहे)



A. वहन

B. अभिसरण

C. उत्सर्जन

D. कोणतेही नाही (सरासरी)

25. सध्या बांधल्या जाणाऱ्या घरांमध्ये पोकळ वीटा वापरल्या जातात, कारण

A. स्वस्त दरात उपलब्ध असतात

B. पोकळ वीटा घर थंड ठेवतात

C. सिमेंटचा वापर कमी करण्यासाठी

D. वेळ वाचवण्यासाठी (सरासरी)

26. विमानांच्या पृष्ठभागावर पांढरा रंग लावला जातो, कारण

A. विमान गरम राहण्यासाठी

B. पांढरा रंग सूर्यप्रकाश परावर्तित करून थंड ठेवतो

C. रंग जास्त काळ टिकतो

D. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी (सरासरी)

27. हिवाळ्यात लोकरीचे कपडे का वापरतात?


A. लोकर स्वस्त आहे

B. लोकर शरीर उबदार ठेवते

C. लोकर शरीर थंड ठेवते

D. वरील सर्व (सरासरी)

28. दिलेल्या चित्रातील क्रमांकांसाठी योग्य पर्याय शोधा



A. 1- वहन 2 - अभिसरण 3- उत्सर्जन

B. 1- उत्सर्जन, 2- अभिसरण 3- वहन

C. 1- अभिसरण, 2- वहन, 3- उत्सर्जन

D. 1- अभिसरण 2- वहन, 3-अभिसरण (सरासरी)

29. एखादी वस्तू गरम आहे हे कसे कळते?

A. स्पर्श करून

B. तापमापक

C. ॲक्सेलरोमीटर

D. दुर्बिण (सोपे)

30. रुग्णाच्या शरीराचे तापमान मोजण्यासाठी वापरले जाणारे उपकरण कोणते?

A. प्रयोगशाळेतील तापमापक

B. क्लिनिकल तापमापक

C. हवामान तापमापक

D.कोणतेही नाही (सोपे)

31. वैद्यकीय तापमापकामध्ये मोजण्याची श्रेणी किती असते?

A. 35°C ते 40°C

B. 35°C ते 44°C

C. 36°C ते 45°C

D. 35°C ते 42°C (सरासरी)

32. मानवी शरीराचे सामान्य तापमान किती असते?

A. 37°C

B. 98°C

C. 100°C

D. 32°C (सोपे)

33. प्रयोगशाळेतील तापमापकामध्ये तापमान श्रेणी किती असते?

A. 35°C ते 42°C

B. 10°C ते 110°C

C. -10°C ते 100°C

D. -10°C ते 110°C (सरासरी)

34. तापमापकामध्ये वापरले जाणारे रासायनिक निर्देशक कोणते?

A. क्लोरीन

B. पारा (Mercury)

C. हायड्रोजन

D. गंधक (Sulphur) (सोपे)

35. सामान्यतः तापमापक तयार करण्यासाठी सर्वाधिक वापरले जाणारे साहित्य कोणते आहे?

A. प्लास्टिक B. धातू

C. काच (Glass) D. लाकूड (सोपे)

36. भारतात प्रामुख्याने वापरली जाणारी तापमापक श्रेणी कोणती आहे?

A. डिग्री सेल्सिअस

B. डिग्री फॅरेनहाइट

C. केल्विन

D. वॅट (सोपे)

37. सेल्सिअस आणि फॅरेनहाइट श्रेणी कोणत्या तापमाना वर समान असते ?

A. 0°

B. 10°

C. 40°

D. -40° (सोपे)

38. सेल्सिअस श्रेणी वरील 0°C हे फॅरेनहाइट श्रेणी वर किती असते?

A. 10°F

B. 20°F

C. 23°F

D. 32°F (सोपे)

39. प्रयोगशाळेतील तापमापक मध्ये वापरलेले रासायनिक पदार्थ कोणते आहे?

A. पाणी

B. पारा

C. अल्कोहोल

D. क्लोरीन (सोपे)

40. खालीलपैकी कोणते उष्णता उत्सर्जन चे उदाहरण आहे?

A. लोणी वितळणे

B. स्टोव्हवर तवा गरम होणे

C. सूर्यापासून उष्णता येणे

D. पाण्याच्या तापमानात बदल (सरासरी)

41. कोणत्या माध्यमात उष्णतेचे वहन दिसून येते

A. धातू

B. हवा

C. लाकूड

D. प्लास्टिक (सोपे)

42. खालील कोणत्या उपकरणाद्वारे शरीराचे तापमान मोजू शकते?

A. वजन काटा

B. तापमापक

C. मूल्यांकन काटा

D. मापन पट्टी (सोपे)

43. उष्णतेची संवेदना मुख्यत्वे कोणत्या अवयवामार्फत होते?

A. कान

B. डोळा

C. त्वचा

D. नाक (सोपे)

44. या चित्रामध्ये दाखविलेल्या उष्णता संक्रमणा ची प्रक्रियेची पद्धत कोणती आहे?



A. अभिसरण

B. वहन

C. उत्सर्जन

D. वरीलपैकी काहीही नाही (सरासरी)

II. 45. स्तंभ A आणि स्तंभ B जुळवा: (सरासरी)

A	B
1. चांदी	A.उष्णता रोधक
2. लाकूड	B वस्तूची उष्णता दाखवते
3. तापमापक	C सर्वात चांगला उष्णता वाहक
4. तापमान	D शरीराचे तापमान दाखवते

46.

A	B
1. उष्णता वहन	A. हवेतून उष्णतेचा प्रसार
2. उष्णता अभिसरण	B. घन पदार्थात उष्णतेचा प्रसार
3. उष्णता उत्सर्जन	C. गरम हवेतील उष्णतेचा प्रसार
4. उष्णता अभिसरण	D. ऊर्जा परिवर्तनाद्वारे उष्णतेचा प्रसार

III. रिकाम्या जागा योग्य उत्तरांनी भरा:

47. तापमानाचे एकक ________ आहे. (सोपे)

48. वस्तूची उष्णता मोजण्याचे परिमाण ____ म्हणतात. (सोपे)

49. तापमान मोजण्यासाठी वापरलेले उपकरण ____ म्हणतात. (सोपे)

50. उष्णता जास्त तपमानाच्या माध्यमातून कमी तापमानाच्या माध्यमाकडे वाहते. ह्या प्रक्रियेला …म्हणतात (सोपे)

51. सूर्यापासून पृथ्वीकडे उष्णतेचे संक्रमण ___पद्धती द्वारे होते . (सोपे)

52. द्रवरूप पदार्थामध्ये उष्णतेचे संक्रमण ….. क्रियेद्वारे होते. (सोपे)

53. जमिनीवरील थंड वारे समुद्राकडे वाहतात त्यांना ____ म्हणून ओळखली जाते. (सरासरी)

54. सर्वाधिक उष्णता वाहकता असणारा घटक म्हणजे ____. (सोपे)

IV. खालील विधाने खरी की खोटी ते लिहा:

55. उष्णता नेहमी कमी तापमान असलेल्या प्रदेशातून जास्त तापमानाच्या प्रदेशात जाते. (सरासरी)

56. लाकूड उष्णतेचा उत्तमरोधक आहे. (सोपे)

57. उष्णतेच्या उत्सर्जनासाठी माध्यम आवश्यक आहे. (सोपे)

58. डॉक्टर वापरत असलेले तापमापक हे प्रयोगशाळेतील तापमापक आहे. (सरासरी)

V. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे द्या: (लघु उत्तरे – 3 गुण)

59. उष्णता संक्रमणाच्या तीन पद्धती लिहा. (सोपे)

60. गरम चहाने भरलेला स्टीलचा कप जास्त वेळ गरम राहतो, पण कागदाचा कप नाही. का? (सरासरी)

61. वैद्यकीय तापमापाक प्रयोगशाळेत का वापरता येत नाही? (सरासरी)

62. प्रयोगशाळेतील तापमापक व वैद्यकीय तापमापक यात दोन फरक लिहा. (सरासरी)

63. उष्ण हवामानात घराच्या बाहेरील भिंती पांढऱ्या रंगाने रंगवाव्यात असे का सांगतात? (सरासरी)

VI. खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे द्या: (संक्षिप्त उत्तरे – 3 गुण)

64. वैद्यकीय तापमापकाचे भाग समजावून सांगा. (सरासरी)

65. शरीराचे तापमान मोजण्याची पद्धत समजावून सांगा. (सरासरी)

VII. खालील प्रश्नांची चार-पाच वाक्यांत उत्तरे द्या: (दीर्घ उत्तरे 4 गुण)

66. उष्णता संक्रमणाच्या च्या तीन पद्धती उदाहरणांसह समजावून सांगा. (सरासरी)

67. उत्तम उष्णता वाहकाचे आणि मंद उष्णता वाहकाचे गुणधर्म लिहा. (सरासरी)

VIII. खालील प्रश्नांची उत्तरे द्या: पाच गुणांचे प्रश्न (दीर्घ उत्तरे – 5 गुण)

68. उष्णता आणि तापमान यातील फरक समजावून सांगा. प्रत्येकासाठी दैनंदिन जीवनातील उदाहरणे द्या. (कठीण)

69. वहन, अभिसरण आणि उत्सर्जन यातला फरक लिहा. (कठीण)

घटक – 4

आम्ले, अल्कली आणि क्षार

• अध्ययन निष्पत्ती -

1. आम्ल आणि अल्कली यांच्यातील फरक जाणून घेतात.
2. दैनंदिन जीवनात उदासिनीकरणाचे उपयोग कसे करावे याची यादी करतात.
3. आम्ल आणि अल्कलीचा अर्थ समजून घेतात.
4. आम्ल, अल्कली आणि क्षारांची उदाहरणे देतात.
5. सूचकांमधील बदल ओळखण्यास शिकतात.
6. आम्ल– अल्कलीतील प्रतिक्रियांचा अभ्यास करतात. (उदासिनीकरण).
7. आम्ल आणि अल्कलींचे दैनंदिन उपयोग जाणून घेतात..

I. खाली प्रत्येकासाठी, चार पर्याय दिले आहेत; योग्य पर्याय निवडून लिहा:

1. खालीलपैकी या द्रावणात निळा लिटमस पेपर लाल होतो

A. सोडियम बायकार्बोनेटचे द्रावण

B. कॅल्शियम हैड्रॉक्साइडचे द्रावण

C. पोटॅशियम हैड्रॉक्साइडचे द्रावण

D. हैड्रोक्लोरिक आम्ल (कठीण)

2. लिटमस पेपर यापैकी कोणापासून बनविला जातो.

A. दगडफूल

B. शेवंतीचे फूल

C. झेंडूचे फूल

D. कमळ फूल (सोपे)

3. अल्कलीची चव----असते.

A. आंबट

B. कडू

C. गोड

D. खारट(सोपे)

4. रासायनिक सूचक ओळखा

A. हळद

B. लिटमस पेपर

C. फिनोल्फ्थॅलीन

D. जास्वंदीच्या पाकळ्या (सोपे)

5. ॲसिटिक आम्ल असलेले पदार्थ

A. पालक

B. दही

C. व्हिनेगर

D. आंबा (सोपे)

6. साबणात वापरली जाणारी अल्कली
A. सोडियम हैड्रॉक्साइड
B. पोटॅशियम हैड्रॉक्साइड
C. अ आणि ब
D. वरीलपैकी काहीही नाही (सरासरी)
7. जास्वंदीच्या पाकळ्यापासून बनविलेल्या सूचकामध्ये अनुक्रमे आम्ल आणि अल्कली घातल्यावर होणारे रंग बदल.
A. लाल आणि हिरवा
B. गडद गुलाबी आणि हिरवा
C. हिरवा आणि निळा
D. हिरवा आणि पांढरा (कठीण)
8. गटात न जुळणारा शब्द ओळखा
A. ॲसिटिक आम्ल
B. सिट्रिक आम्ल
C. लॅक्टिक आम्ल
D. हैड्रोक्लोरिक आम्ल (सरासरी)
9. खालील जोडया जुळवा

A. खाण्याचा सोडा	1..सूचक
B. व्हिनेगर	2..क्षार
C. मीठ	3.आम्ल
D. फिनोल्फ्थॅलीन	4.अल्कली

A.A-3, B-4, C-2, D-1
B.A-4, B-3, C-2, D-1
C.A-3, B-4, C-1, D-2
D. A-4, B-3, C-1, D-2 (कठीण)
10. बरोबर असलेले विधान ओळखा
A. मॅग्नेशियमची निवळी अल्कली आहे
B. साखर एक सूचक आहे
C. शाम्पू हे आम्लाचे उदाहरण आहे
D. स्वयंपाकाचे मीठ एक सूचक आहे (सरासरी)
11. बेकिंग (खाण्याच्या) सोडयाचे रासायनिक नांव
A. सोडियम कार्बोनेट
B. सोडियम बायसल्फेट
C. सोडियम बायकार्बोनेट
D. सोडियम क्लोराईड (सरासरी)
12. सोडियम हैड्रॉक्साइड आणि हैड्रोक्लोरिक आम्ल एकमेकांशी क्रिया करून तयार होणारे पदार्थ,
A. मीठ आणि पाणी
B. मीठ आणि हैड्रोजन
C. आम्ल आणि पाणी
D. अल्कली (सरासरी)

13. हळदीचे सूचक वापरल्याने रंग बदलणारे द्रावण

A. साखरेचे द्रावण

B. व्हिनेगर

C. मिठाचे द्रावण

D. साबणाचे द्रावण (कठीण)

14. चुकीचे विधान ओळखा:

प्रयोगशाळेत आम्ले आणि अल्कली वापरताना काळजी घेतली पाहिजे कारण,

A. त्यांच्यात विनाशकारी गुणधर्म आहेत

B. जळजळ निर्माण करतात

C. त्वचेला अपायकारक असतात

D. त्यांच्यात स्फटिकीकरण गुणधर्म आहेत. (सरासरी)

15. समीकरण पूर्ण करा.

$HCl + NaOH \rightarrow NaCl +$ ----

A. H_2O

B. H_2

C. O_2

D. H_2O_2 (सोपे)

16. आवळ्यामध्ये हे जीवनसत्व मुबलक प्रमाणात असते

A. जीवनसत्व A

B. जीवनसत्व C

C. जीवनसत्व D

D. जीवनसत्व E (सोपे)

17. आम्लीय पाऊस म्हणजे

A. पावसाचे पाणी आम्लीय बनते.

B. पावसाचे पाणी अल्कली बनते.

C. पावसाच्या पाण्यात सल्फ्यूरिक आम्ल आणि कार्बोनिक आम्ल जास्त असते.

D. पावसाच्या पाण्यात सिट्रिक आम्ल आणि ॲसिटिक आम्ल जास्त असते.

A. 1, 2 आणि 3

B. 1 आणि 2 फक्त

C. 1, 3 आणि 4

D. 1 आणि 3 फक्त (सरासरी)

18. खालीलपैकी कोणत्या स्वच्छकांत अमोनियम हैड्रॉक्साइड वापरले जाते?

A. साबण

B. खिडक्यांची स्वच्छके

C. व्हिनेगर

D. स्वच्छके (सोपे)

19.कारखान्यातील टाकाऊ कचरा उदासीन करण्यासाठी वापरला जाणारा पदार्थ

A. मीठ

B. व्हिनेगर

C. चुनखडी

D. पाणी (सोपे)

20. मुंगीच्या दंशासाठी वापरले जाणारे एक सामान्य द्रावण

A. खाण्याच्या सोडयाचे द्रावण

B. कॅलामाइनचे द्रावण

C. अ आणि ब दोन्ही वापरले जाऊ शकतात

D. यापैकी कोणतेही नाही (सोपे)

21. जमिनीत रासायनिक खतांच्या अती वापरामुळे हा परिणाम होतो

A. आम्लता वाढते

B. अल्कलीचे प्रमाण वाढते

C. दोन्ही वाढते

D. आम्लता कमी होते (सरासरी)

22. चुन्याच्या निवळीमध्ये लाल लिटमस पेपर बुडविला तर

A. निळा होतो

B. रंग बदलत नाही

C. लाल होतो

D. पांढरा होतो (सरासरी)

23. हैड्रोक्लोरिक आम्ल आणि मॅग्नेशियम हैड्रॉक्साईड विशिष्ट प्रमाणात मिसळल्यास ही क्रिया घडते:

A. उत्पादन

B. उदासिनीकरण

C. बाष्पीभवन

D. स्फटिकीकरण (सरासरी)

24. मुंगीच्या दंशामध्ये खालीलपैकी कोणते आम्ल असते ?

A. सिट्रिक आम्ल

B. टार्टारिक आम्ल

C. ऑक्झॅलिक आम्ल

D. फॉर्मिक आम्ल (सरासरी)

25. निळा लिटमस पेपर आम्लामध्ये या रंगात बदलतो.

A. निळा

B. लाल

C. पिवळा

D. हिरवा (सोपा)

26. हळदीचे सूचक अल्कलीमध्ये या रंगात बदलते :

A. लाल

B. काळा

C. हिरवा

D. निळा (सोपा)

27. या प्रक्रियेद्वारे मीठ तयार होते:

A. आम्ल + आम्ल

B. अल्कली + अल्कली

C. आम्ल + अल्कली

D. पाण्याचे मिश्रण (सरासरी)

28.खालीलपैकी हे अल्कली आहे :

A. हैड्रोक्लोरिक आम्ल

B. लिंबाचा रस

C. चुनखडी

D. ॲसिटिक आम्ल (सरासरी)

29. खालीलपैकी नैसर्गिक सूचक :

A. लिटमस पेपर

B. मिथाइल ऑरेंज

C. फिनोल्फ्थॅलीन

D. ब्रोमोथायमॉल निळा (सरासरी)

30. सामान्यपणे अल्कलीमध्ये समाविष्ट घटक :

A. OH^- B. H^+

C. Cl^- D. Na^+(सोपा)

31. खालीलपैकी हे नैसर्गिक सूचक नाही:

A. लिटमस पेपर

B. हळद

C. फिनोल्फ्थॅलीन

D. जास्वंदीचे फूल (सोपे)

32. उदासिनीकरण क्रियेत उष्णतेत होणाऱ्या बदलाचा प्रकार:

A. उष्णता बदल होत नाही

B. शीतकरण

C. उष्णता शोषली जाते

D. उष्णता मुक्त होते (सरासरी)

II. योग्य उत्तरांसह रिकाम्या जागा भरा:

33. लिंबाच्या रसात आढळणारे मुख्य आम्ल ________ आहे.(सोपे)

34. लिटमस हे ________ सूचक आहे. (सोपे)

35. चुनखडी हे ________ आहे. (सरासरी)

36. चिंचेमध्ये ________ आम्ल असते. (सोपे)

37. आम्ल आणि अल्कली यांच्या मिश्रणातून ______ तयार होते. (सोपे)

38. लिटमस ________ पासून मिळतो. (सोपे)

39. हळदीचे सूचक लिंबाच्या रसात बूडविल्यास तो________ रंगात बदलते. (सोपे)

40. स्वयंपाकाच्या मिठामध्ये असलेले क्षार________ आहे. (सोपे)

41. निळा लिटमस पेपर लिंबाच्या रसात ________ रंगात बदलतो. (सरासरी)

42. आवळा (भारतीय गूसबेरी) ________ व्हिटॅमिनने समृद्ध असतो. (सोपे)

III. स्तंभA आणि स्तंभ B जुळवा: **(कठीण)**

43. A B

A	B
1. हैड्रोक्लोरिक आम्ल	i. अल्कली
2. चुनखडी	ii. आम्ल + अल्कली
3. हळद	iii. अन्नाचे पचन
4. क्षार	iv. नैसर्गिक सूचक

44.

A	B
1. लिटमस	i. हळ्दीचे सूचक
2. हैड्रॉक्साइड	ii. नैसर्गिक सूचक
3. हळद	iii. लिंबाचा रस
4. क्षार	iv. अल्कली
5. ॲसिटिक आम्ल	v.उदासिनीकरण

45.

A	B
1. फिनोल्फ्थॅलीन	i. लिंबाचा रस
2. दगडफूल	ii. क्षार + पाणी
3. ॲसिटिक आम्ल	iii. लिटमसचा स्रोत
4. सोडियम हैड्रॉक्साइड	iv. मानवनिर्मित सूचक
5. उदासिनीकरण क्रिया	v. उदासिनीकरण

IV. चूक की बरोबर सांगा आणि चुकीचे विधान दुरुस्त करा:

46. नळाचे पाणी आम्लधर्मी असते. (सोपे)
47.आम्लता (पित्त)असताना आपण प्रत्याम्ल घेतले पाहिजेत. (सरासरी)
48. उदासिनीकरण ही आम्ल आणि उदासीन पदार्थांमधील क्रिया आहे. (सरासरी)
49. चुन्याच्या निवळीत निळा लिटमस लाल होतो. (सरासरी)
50. हळद हे एक रासायनिक सूचक आहे. (सोपे)
51. स्वयंपाकाचे मीठ हे अल्कली आहे. (सोपे)
52. आम्लीय पावसात सिट्रिक आम्लाचे प्रमाण जास्त असते. (सरासरी)
53. दह्यामध्ये ॲसिटिक आम्ल असते. (सोपे)
54. रासायनिक खतांचा अती वापर केल्याने मातीची आम्लता कमी होते. (सरासरी)
55. कार्बोनिक आम्ल 'व्हिटॅमिन-सी' चा स्रोत म्हणून वापरता येते. (सोपे)

V. खालील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात किंवा एका वाक्यात द्या:

56. हळदीच्या सूचकाचा रंग कोणता असतो ? (सोपे)
57. हैड्रोक्लोरिक आम्लाचे रासायनिक सूत्र काय आहे? (सोपे)
58. लिंबाचा रस कोणत्या प्रकारचा पदार्थ आहे? (सोपे)
59. क्षाराचे एक उदाहरण द्या. (सोपे)
60. लिटमसचा मूळ स्रोत कोणता आहे? (सोपे)
61.जर एखाद्या पदार्थात हैड्रॉक्झिल गट असेल तर तो आम्ल आहे की अल्कली ? (सोपे)
62. व्हिनेगरमध्ये असलेल्या आम्लाचे नाव सांगा. (सरासरी)
63. ब्लीचिंग पावडरचे रासायनिक नाव काय आहे? (सरासरी)
64. चुन्याच्या निवळीतील अल्कलीचे नाव सांगा. (सोपे)

VI. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यांमध्ये द्या: (संक्षिप्त उत्तरे - 2 गुण)

65. क्षार कसे तयार होतात? (सरासरी)

66. सूचक म्हणजे काय? दोन उदाहरणे लिहा. (सरासरी)

67. आम्ल आणि अल्कलीतील फरक लिहा. (सरासरी)

68. दोन नैसर्गिक सूचकांची नावे लिहा. (सोपे)

69. साबणाच्या द्रावणामध्ये हळदीचा सूचक रंग बदलतो – का? (सरासरी)

70. आम्ल पाण्यात हळूहळू घालणे सुरक्षित आहे - का? (सरासरी)

71. हळदीचा रंगअल्कलीमध्ये बदलतो - का? (सरासरी)

72. आम्लीय द्रावणात लिटमस बुडवल्यावर लाल होतो - का? (सरासरी)

73. उदासिनीकरणाच्या क्रियेत उष्णता निर्माण होते - का? (सरासरी)

74. हळद हे एक नैसर्गिक सूचक कसे? (सरासरी)

75. स्वयंपाकाच्या मिठाला क्षार का म्हणतात? (सरासरी)

76. खालील पदार्थांचे आम्ल आणि अल्कलीमध्ये वर्गीकरण करा.: (सरासरी)

लिंबाचा रस, बेकिंग सोडा, संत्र्याचा रस, दही, व्हिनेगर, साबणाचे द्रावण.

77. खालील चित्रांचे निरीक्षण करा आणि त्यांच्या स्वरूपानुसार आम्ल किंवा अल्कलीमध्ये वर्गीकरण करा. (सरासरी)



व्हिनेगर बेकिंग सोडा उर्ध्वपातीत पाणी



लिंबाचा रस बोरीक पावडर सोडा

78. आम्लीय पाऊस म्हणजे काय? (सरासरी)

79. उर्ध्वपातीत पाणी आम्लधर्मी /अल्कधर्मी /उदासीन असते का? हे तुम्ही कसे तपासाल? (कठीण)

80. अनेक घरगुती उत्पादने, जसे की खिडकी स्वच्छके इत्यादीमध्ये अमोनिया असते. त्याचा गुणधर्म आम्लधर्मी /अल्कधर्मी तुम्ही कसे ठरवाल? (कठीण)

81. खालील पदार्थांमध्ये असलेल्या आम्लाचे नाव सांगा:

i. लिंबाचा रस ii दही iii चिंच iv पालक (सरासरी)

82.खालील कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या आम्लांची नावे सांगा:

i. डोळे धुणे ii. कर्बयुक्त पेय (सरासरी)

83. रासायनिक नाव लिहा:

i. मीठ ii बेकिंग सोडा (सोपे)

84. लिंबाचा रस आंबट, तर चुन्याची निवळी कडू असते- का? (सरासरी)

85. खालील कामात वापरल्या जाणाऱ्या अल्कलीचे नाव सांगा: (सरासरी)

(i) कपड्यांवरील ग्रीसचे डाग काढून टाकण्यासाठी ______,

(ii) आम्लरोधक ______

86. आम्लीय पावसाला कारणीभूत दोन वायू प्रदूषकांची नावे सांगा. (सरासरी)

VII. खालील प्रश्नांची उत्तरे तीन-चार वाक्यांमध्ये द्या: (संक्षिप्त उत्तरे - 3 गुण)

87. नैसर्गिक आणि मानवनिर्मित सूचकांमधील फरक लिहा. (कठीण)

88. उदासिनीकरणाची क्रिया उदाहरणासहीत स्पष्ट करा. (कठीण)

89. फिनोल्फ्थॅलीन सूचकाच्या रंग बदलांचे वर्णन करा. (कठीण)

90. जर तुम्ही पित्ताने पिडीत असाल तर तुम्ही प्रत्याम्लाची गोळी घेता. का? (कठीण)

91. मुंगी चावल्यावर त्वचेवर कॅलामाइन द्रावण लावले जाते. का? (कठीण)

92. कारखान्यातील टाकाऊ कचऱ्याची विल्हेवाट लावण्यापूर्वी उदासीन करावा. का ?

VIII. खालील प्रश्नांची उत्तरे चार-पाच वाक्यांमध्ये द्या: (लघुत्तरी– 4 गुण)

93. आम्ल आणि अल्कलीतील फरक लिहा. (कठीण)

94. शरीरात किंवा घरी वापरल्या जाणाऱ्या आम्ल आणि अल्कलींचे उदाहरणांसह स्पष्टीकरण करा. (कठीण)

95. क्षारांचा उद्देश आणि दैनंदिन उपयोग सांगा. (सरासरी)


96. नैसर्गिक सूचकांबद्दलच्या एका कृतीचे वर्णन करा. (कठीण)

97. क्षार तयार होण्याची प्रक्रिया आणि त्याचे उपयोग स्पष्ट करा. (कठीण)

98. दैनंदिन जीवनात उदासिनीकरणाचा वापर स्पष्ट करा .

A. टूथपेस्ट (दंतमंजन) B. मुंगी चावण्यावर उपचार

99. खालील चित्राचे निरीक्षण करा. अ, ब, क आणि ड ही द्रावणे दिली आहेत. खालील द्रावणात लाल लिटमस पेपर बुडवल्यास कोणत्या रंगात बदलेल ते सांगा आणि द्रावणाचे स्वरूप स्पष्ट करा. (कठीण)



पाण्यात दूध पाण्यात बेकिंग पावडर पाण्यात व्हिनेगर पाण्यात ग्लुकोज

IX. खालील प्रश्नांची उत्तरे द्या: (दीर्घोत्तरी - 5 गुण)

100.आम्ल, अल्कली आणि क्षारांचे उपयोग आणि अपायकारक परीणाम स्पष्ट करा (कठीण)

101.उदासिनीकरणाची क्रिया समीकरण लिहून स्पष्ट करा (कठीण)

102. आम्ले, अल्कली आणि सूचके यांचे थोडक्यात विवरण करा. (कठीण)

प्रकरण -5

भौतिक आणि रासायनिक बदल

अध्ययन निष्पत्ती:

1. भौतिक आणि रासायनिक बदल ओळखतात.
2. भौतिक बदल आणि रासायनिक बदल यांच्यातील फरक स्पष्ट कतात.
3. दैनंदिन जीवनात गंज येण्याच्या घटना समजून घेतात.

I. खालील प्रत्येकासाठी चार पर्याय दिले आहेत; योग्य पर्याय निवडा आणि लिहा.

1. साखर पाण्यात विरघळली जाते. हे या बदलाचे एक उदाहरण आहे.

अ. रासायनिक बदल

ब. भौतिक बदल

क. उदासीन (Neutral)

ड. जैविक बदल (सोपे)

2. गटात समाविष्ट नसलेला शब्द ओळखा.

अ. अन्नाचे पचन

ब. द्राक्षाच्या रसाचे आंबवणे (Fermentation)

क. फळांचे पिकणे.

ड. बर्फ वितळणे. (मध्यम)

3. शेतकरी शेतीसाठी वापरत असलेली फावडे आणि कुदळ ही अवजारे गंजलेलीअसतात. हा कोणता बदल आहे..

अ. भौतिक बदल

ब. रासायनिक बदल

क. भौतिक आणि रासायनिक दोन्ही बदल

ड. यापैकी कोणताही नाही (सोपे)

4. भौतिक बदलाबाबत यापैकी कोणते चुकीचे विधान आहे ते ओळखा.

अ. एक नवीन पदार्थ तयार होतो.

ब. तात्पुरत्या स्वरूपाचे

क. आकार, आकारमान, रंगात बदल

ड. अवस्थेत बदल (मध्यम)

5. भौतिक बदलाचे उदाहरण हे आहे.

अ. धाग्याचे तुकडे करणे.

ब. बर्फ पाण्यात वितळतो.

क. खडू पीसणे.

ड. वरील सर्व (सोपे)

6. रासायनिक बदलाचे उदाहरण हे आहे.

अ. मॅग्नेशियम जळते.

ब. फटाके फोडणे.

क. प्रकाश संश्लेषण

ड. वरील सर्व (मध्यम)

7. पानांपासून कंपोस्ट(खत) तयार करणे हे याचे उदाहरण आहे.

अ. भौतिक बदल

ब. रासायनिक बदल

क. जैविक बदल

ड. वरीलपैकी कोणतेही नाही. (सोपे)

8. कार्बन डायऑक्साईड चुन्यात मिसळल्यावर पांढरा रंग देणारे क्षार

अ. कॅल्शियम कार्बोनेट ($CaCO_3$)

ब. कॅल्शियम सल्फेट($CaSO_4$)

क. पोटॅशियम कार्बोनेट(K_2CO_3)

ड. कॅल्शियम(Ca). (मध्यम)

9. जेंव्हा एल.पी.जी .(द्रवरूप पेट्रोलियम वायू) सिलेंडर मधील द्रव इंधन वायूमध्ये बदलते,हे याचे उदाहरण आहे.

अ. रासायनिक बदल

ब. भौतिक बदल


C. 7

D. 9 (सोपे)

21. *साबणाच्या बुडबुड्यांवर विविध रंग का दिसतात?

A. प्रकाशाचे व्यतिकरण (Interference)

B. प्रकाशाचे विवर्तन

C. प्रकाशाचे ध्रुवीकरण

D. प्रकाशाचे अपवर्तन (मध्यम)

22. *इंद्रधनुषातील प्राथमिक रंग कोणते?

A. पांढरा, निळा, लाल (WBR)

B. पिवळा, हिरवा, गुलाबी

C. हिरवा, लाल, निळा (RGB)

D. काळा, पांढरा, निळा (मध्यम)

23. *वातावरणामध्ये प्रकाशाचे प्रसारण का होते?

A. कार्बन डायऑक्साईड

B. धुळीचे कण

C. हीलियम

D. पाण्याच्या वाफेचे कण (मध्यम)

24. *जेव्हा अंतराळवीर वर जातो, तेव्हा आकाश कसे दिसते?

A. निळे

B. काळे

C. लाल

D. पांढरे (मध्यम)

25. *सपाट आरशात तुमची प्रतिमा तुमच्याकडे 10 cm/s या वेगाने येत असेल, तर तुम्ही आरशाकडे कोणत्या वेगाने जात असाल?

A. 10 cm/s

B. 5 cm/s

C. 20 cm/s

D. 15 cm/s (मध्यम)

26. *दिलेल्या रंगांची तरंगलांबी (wavelength) वाढत्या क्रमात असेल तर त्याचा कोणता क्रम असेल – (1) नारंगी, (2) निळा, (3) पिवळा, (4) जांभळा

A. 1,2,3,4

B. 1,3,2,4

C. 4,2,1,3

D. 4,2,3,1 (कठीण)

27. इंद्रधनुष्यात नारंगी आणि हिरव्यामधे कोणता रंग येतो?

A. जांभळा

B. निळा

C. पिवळा

D. लाल (मध्यम)

28. *काच स्लॅबमध्ये प्रकाशाच्या रंगांचे अपस्करण(dispersion) कोणामुळे होते?

A. प्रकाशाचे एकूण अंतर्गत परावर्तन

B.प्रकाशाचेविवर्तन

C. प्रकाशाचे अपस्करण

D. प्रकाशाचे परावर्तन (मध्यम)

29. सूक्ष्मदर्शकामध्ये कोणते भिंग वापरले जाते?

A. द्विपार्श्व बहिर्गोल भिंग (Biconvex) B. अंतर्गोल भिंग

C. दंडगोलाकार भिंग D. बहिर्गोल भिंग (सोपे)

30. दुर्बीण (binoculars), खगोलीय दुर्बीण (astronomical telescope), कॅमेरा व सूक्ष्मदर्शकामध्ये कोणते भिंग वापरले जाते?

A. बहिर्गोल भिंग

B. अंतर्गोल भिंग

C. गोलाकार भिंग

D. दंडगोलाकार भिंग (सोपे)

31. प्रकाश कसा प्रवास करतो?

A. वक्र

B. डावीकडे

C. उजवीकडे

D. सरळ रेषेत (सोपे)

32. सपाट आरशातील वस्तूची प्रतिमा:

A. उलटी व वास्तविक आकाराची

B. सुलट व वास्तविक

C. मोठी व सुलट

D. गडद (मध्यम)

33. कोणता आरसा दूरची वस्तू लहान दाखवतो?

A. सपाट आरसा

B. बहिर्गोल आरसा

C. अंतर्गोल आरसा

D. भिंग (मध्यम)

34. प्रकाशाच्या परावर्तनाचा उद्देश काय आहे?

A. प्रकाश अभिशोषण

B. प्रकाश विखुरणे

C. प्रकाश वळवणे

D. प्रकाश नष्ट करणे (मध्यम)

35. प्रकाश कोणत्या प्रकारची ऊर्जा आहे?

A. ध्वनी ऊर्जा

B. उष्णता ऊर्जा

C. विद्युत ऊर्जा

D. प्रकाशीय ऊर्जा (Radiant energy) (सोपे)

II. रिकाम्या जागा भरा:

36. प्रकाश __________ रेषेत प्रवास करतो. (सोपे)

37. __________ आरसा हा आतील बाजुने वक्र दिसतो. (मध्यम)

38. सपाट आरसा __________ प्रतिमा तयार करतो. (मध्यम)

39. सपाट आरशामध्ये जर एखाद्या वस्तूची प्रतिमा उजवीकडे दाखवत असेल, तर प्रत्यक्षात ती वस्तू __________ बाजुला असते. (मध्यम)

40. अंतर्गोल आरशाचा वापर __________ मध्ये होतो. (मध्यम)

41. प्रकाशाला सात रंगांमध्ये विभागण्यासाठी __________ वापरता येते. (मध्यम)

42. पडद्यावर घेता न येणाऱ्या प्रतिमेला __________ म्हणतात. (मध्यम)

43. पडद्यावर घेता येणाऱ्या प्रतिमेला __________ म्हणतात. (मध्यम)

III. चुक/ बरोबर लिहा:

44. प्रकाश किरण सरळ रेषेतून प्रवास करतो. *(सोपे)*

45. अंतर्गोल आरसा मोठी व सुलट प्रतिमा तयार करू शकतो. *(मध्यम)*

46. बहिर्गोल भिंग नेहमी वास्तविक (real) प्रतिमा तयार करतो. *(मध्यम)*

47. प्रकाश कोणत्याही वस्तूंवर परावर्तित झाल्यास ती दिसू शकते. *(मध्यम)*

48. सपाट आरसा नेहमीच वस्तू इतकीच प्रतिमा तयार करतो. *(मध्यम)*

49. बहिर्गोल भिंगाचा वापर करून वास्तविक प्रतिमा मिळू शकते. *(सोपे)*

50. पडद्यावर आभासी (virtual)प्रतिमामिळू शकते. *(सोपे)*

51. बहिर्गोल आरशाचा वापर करुन प्रतिमा मोठी होऊ शकते. *(मध्यम)*

52. अंतर्गोल आरशाने मोठी व उलटी प्रतिमा मिळू शकते. *(मध्यम)*

1. IV. स्तंभ A आणि स्तंभ B जुळवा *(कठीण)*

53.

A	B
A) सपाट आरसा	i. दूरची वस्तू लहान दिसते
B) अंतर्गोलआरसा	ii. प्रकाशाचा दिशानिर्देश बदलतो
C) बहिर्गोल आरसा	iii. सुलट प्रतिमा
D) प्रकाशाचे परावर्तन	iv. जवळची वस्तू मोठी दिसते

54. *

A		B
A) बहिर्गोल आरसा	i.	दूरची वस्तू लहान दिसते
B) सपाट आरसा	ii.	जवळची वस्तू मोठी दिसते
C) अंतर्गोलआरसा	iii.	$\angle i = \angle r$
D) आपाती/परावर्तन कोन	iv.	वास्तविक प्रतिमेचा आकार

V. एका शब्दात/एक वाक्यात उत्तर द्या:

55. गोलाकार आरशातील प्रकाश परावर्तनाला काय म्हणतात? *(मध्यम)*

56. प्रकाशाचा स्रोत कोणता? *(मध्यम)*

57. वाहनात बाजूचे आरसे(side mirror) कोणत्या प्रकारचे असतात? *(मध्यम)*

58. आपण प्रकाशाची दिशा कशी बदलू शकतो? *(मध्यम)*

59. कोणत्या प्रकारच्या आरशाने वास्तविक प्रतिमा तयार होते? *(मध्यम)*

60. कोणत्या प्रकारच्या भिंगाने आभासी प्रतिमा तयार होते? *(मध्यम)*

61. गोलाकार आरशाचे एक उदाहरण द्या. *(मध्यम)*

62. वास्तविक प्रतिमा म्हणजे काय? *(सोपे)*

63. आरशांचे दोन प्रकार कोणते? *(मध्यम)*

64. भिंगाचा एक उपयोग लिहा? *(मध्यम)*

65. बहिर्गोल आरसा म्हणजे काय? *(मध्यम)*

66. प्रकाश चमकदार किंवा पॉलिश केलेल्या पृष्ठभागावर पडल्यावर काय होते? *(मध्यम)*

67. बहिर्गोल आरशाचा एक उपयोग सांगा. *(मध्यम)*

VI. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा (2 गुण):

68. *परावर्तनाचे नियम लिहा? *(मध्यम)*

69. आरशाचा उपयोग लिहा? *(सोपे)*

70. अंतर्गोल आरशाचे दोन उपयोग सांगा. *(मध्यम)*

71. वक्र नळीमधून आपण मेणबत्तीचा प्रकाश पाहु शकत नाही. का? *(मध्यम)*

72. प्रकाशाचे परावर्तन म्हणजे काय? *(मध्यम)*

73. आकाशात इंद्रधनुष्य केव्हा दिसते? *(मध्यम)*

74. आपण पाण्यात झाडे किंवा इमारतींचे प्रतिबिंब का पाहतो? *(मध्यम)*

75. अंतर्गोल आणि बहिर्गोल आरशांना गोलाकार आरसा का म्हणतात? *(मध्यम)*

76. स्टेनलेस स्टील प्लेटमध्ये तयार होणारी प्रतिमा सुलट व वस्तू इतकीच का असते? *(मध्यम)*

77. इंद्रधनुष्याच्या रंगांसारखे रंग दिसणारी आणखी दोन उदाहरणे द्या. *(कठीण)*

78. टीना जर सात रंगांनी रंगून बनवलेल्या चाकाला वेगात फिरवते तेव्हा त्याचा पुर्णपणे पांढरा रंग दिसतो, याला कारण काय? *(कठीण)*

79. चमच्याच्या आतील बाजूची प्रतिमा कोणत्या प्रकारची बनते? *(कठीण)*

80. सपाट आरशात तयार होणाऱ्या प्रतिमांचे गुणधर्म लिहा. *(कठीण)*

81. "प्रकाश नेहमी सरळ रेषेत प्रवास करतो" याचे स्पष्टीकरण द्या. *(कठीण)*

82. सपाट आरशात उजवा हात डावा दिसतो, हा कोणता गुणधर्म आहे? *(मध्यम)*

83. सपाट आरशात बाजुंची अदला-बदल (lateral inversion) का होते? *(मध्यम)*

84. वाहनांत बहिर्गोल आरसा का वापरतात? *(मध्यम)*

VII. तीन-चार वाक्यांत उत्तर द्या:(3 गुण)

85. सपाट आरशाचे गुणधर्म लिहा. *(कठीण)*

86. बहिर्गोल आरसा व अंतर्गोल आरसा यामधील फरक स्पष्ट करा. *(कठीण)*

87. सपाट, बहिर्गोल व अंतर्गोल आरशात तयार होणाऱ्या प्रतिमांमधील फरक स्पष्ट करा. *(कठीण)*

88. प्रकाश जर अंतर्गोल आरशातून कागदावर पडला तर तो कागद जळतो, असे का? *(कठीण)*


VIII. चार-पाच वाक्यांत स्पष्टीकरण द्या: (4 गुण)

89. प्रकाशाचे परावर्तन म्हणजे काय? आकृतीसह स्पष्ट करा. *(कठीण)*
90. अंतर्गोल आरशामध्ये बनणाऱ्या प्रतिमेचे स्पष्टीकरण द्या. *(कठीण)*

91. या चित्रात सपाट आरश्यासमोर एक जळणाऱ्या मेणबत्तीची प्रतिमा आहे. चित्र पाहा आणि प्रतिमेचे गुणधर्म लिहा. *(कठीण)*



92. इंद्रधनुष्यातील सात रंगांची क्रमवार नावे लिहा. *(मध्यम)*
93. बहिर्गोल भिंगाचा वापर करून सूर्याची वास्तविक प्रतिमा कशी मिळवता येते हे समजवा. *(कठीण)*
94. *खालील चित्रात बहिर्गोल आणि अंतर्गोल भिंगावर प्रकाश किरण पडले आहेत. भिंगाच्या प्रकारानुसार ते किरणांना अभिसारित (converge) करतात की अपसारित(diverge), हे दर्शवा. *(कठीण)*



गणिती प्रश्न (Numerical Problems):

95. *जर प्रकाशाचा आपाती कोन (incidence angle) स्तंभिकेशी40° असेल, तर परावर्तन कोन (reflection angle) किती? *(मध्यम)*
96. *जर प्रकाशाचा आपाती कोन (incidence angle) स्तंभिकेशी30° असेल, तर परावर्तन कोन किती? *(कठीण)*

97. जर आपण सपाट आरशापासून 2 मीटर अंतरावर उभे असाल, तर प्रतिमा किती अंतरावर दिसेल? *(कठीण)*

98. *आरसा 45° कोनावर परावर्तन करत असताना प्रतिमेची वैशिष्ट्ये आकृतीसह स्पष्ट करा. *(मध्यम)*
99. *आपाती कोन = 30° दिल्यास परावर्तन कोन काय असेल? *(मध्यम)*

100. *जर किरण स्तंभिकेशी 45° कोनाने येत असेल, तर परावर्तन किरण कोणत्या दिशेने जाईल? *(कठीण)*

(Note: Questions labelled with asterisk (*) are outside the syllabus for class 7)

प्रकरण 12 वे
अरण्ये : आपली जीवनरेखा

अध्ययन निष्पत्ती-

1.अरण्ये ही आपली कायम स्वरूपी जीवनरेखा आहेत हे समजून घेतात .

2. जंगलांच्या मूलभूत घटक ओळखतात.

3. अन्नसाखळीचा अर्थ स्पष्ट करणे आणि उदाहरण देणे (उदा वनस्पतीहरण वाघ.)

4. विघटकांचे (Decomposers) महत्व स्पष्ट करतात.

5. दैनंदिन जीवनाच्या संदर्भात जंगलांचे महत्त्व समजून घेतात.
(ऑक्सिजन उत्पादन, पर्जन्य नियंत्रण, हवामान स्थिरता)

6.पर्यावरणीय संतुलन राखण्यात जंगलांची भूमिका स्पष्ट करतात .

7. जंगलतोडीचे परिणाम स्पष्ट करतात.
(उदा. पावसाचा अभाव, मातीची धूप, सजीव प्रजाती नष्ट होणे.)

8.वन संरक्षण करण्याच्या आवश्यकतेवर चर्चा करतात .

9. जंगलाच्या वेगवेगळ्या टप्प्यांचे वर्णन करतात.

10. अन्नसाखळी आणि अन्नजाळे यांच्यातील फरक स्पष्ट करतात.

11.लोकांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगतात.

12.हवामान, जलचक्र आणि हवेच्या गुणवत्तेवर जंगलांचा कसा परिणाम होतो हे समजून घेतात.

13.आपल्याला जंगलांपासून अनेक उत्पादने मिळतात हे जाणून घेतात.

I. खालीलपैकी प्रत्येकासाठी दिलेल्या चार पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा आणि ते लिहा

1. जंगले पर्यावरणात खालील प्रकारे कार्य करतात:

A. ते स्वच्छता राखू शकतात

B. ते आधुनिकता वाढवू शकतात

C. ते हिरवी फुफ्फुसे आणि जल शुद्धीकरण प्रणाली म्हणून काम करतात

D. ते प्रदूषण वाढवतात (साधारण)

2. जंगलतोडीचा सध्याचा परिणाम म्हणजे

A. मानवी वस्तीत वन्य प्राणी प्रवेशकरत आहेत

B. वन्य प्राणी आनंदाने जगत आहेत

C. वन्य प्राण्यांच्या संख्येत वाढ

D. वन्य प्राणी नष्ट होत आहेत (साधारण)

3.खालीलपैकी कोणते उत्पादन झाडांपासून मिळवले जात नाही

A. कात

B. संगमरवरी

C. लाह (लाख)

D. गोंद (डिंक) (सुलभ)

4. झाडाच्याखोडाच्या फांद्या असलेला भाग

A. छत B. वरचा थर

C. खालचा छत D. मुकुट (सुलभ)

5. वातावरणातील ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडचे संतुलन राखण्याचे कारण म्हणजे

A. अरण्ये

B. पाणी

C. हवा

D. तापमान (उष्णता) (सुलभ)

6. येथेअनेक अन्नसाखळ्या आढळतात

A. शहर

B. अरण्ये

C. आकाश

D. खेडे (सुलभ)

7. जंगलांनाहिरवे फुफ्फुसे म्हणतात कारण

A. ते वन्यजीवांना आश्रय देतात

B. ते वातावरणात ऑक्सिजन पुरवतात

C. ते वातावरणात कार्बन डायऑक्साइड सोडतात


D. ते वातावरणातील ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडचे संतुलन राखतात (साधारण)

8. मृतवनस्पती आणि प्राण्यांच्या अवशेषांचे बुरशीमध्ये रूपांतर करणारे सूक्ष्मजीव

A. गांडूळ B. विषाणू

C. विघटक D.वरील पैकी कोणतेही नाह? (साधारण)

9.खालील चित्रात घडणारी प्रक्रिया ही



A. ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडचे संतुलन

B. प्रकाशसंश्लेषण

C. बाष्पीभवन

D. शहरीकरण (साधारण)

10.विघटक मृत वनस्पती आणि प्राण्यांच्या अवशेषांचे _________ त रूपांतरकरतात.

A. पाण्यात

B. ऑक्सिजन

C. बुरशी (Humus)

D. मिथेन (सुलभ)

11.हे जीवन आणि चैतन्य यांनी परिपूर्ण असलेले एक सक्रिय सजीव आस्तित्व आहे.

A. गाव

B. शहर

C. पर्यावरण

D. वन (सुलभ)

12.वनीकरण म्हणजे

A. जंगलात कारखाना सुरू करणे

B. वन्यजीवांचे संरक्षण करणे

C. वनक्षेत्र वाढवण्यासाठी रोपे लावणे

D. वरील सर्व (सुलभ)

13.या चित्रातील झाडाचे नाव आहे



A. सागवान B. बोरुग

C. कडुनिंब D. बांबू (सुलभ)

14.जंगलाच्या खालच्या स्तराला काय म्हणतात?

A. छताचा स्तर B. झुडुपाचा स्तर

C. खालच्या मजल्याचा स्तर D. मधल्या मजल्याचा स्तर (सुलभ)

15.जंगलांमध्ये ऑक्सिजन निर्मितीसाठी जबाबदार असलेली क्रिया म्हणजे

A. श्वसन क्रिया

B. पचन क्रिया

C. उत्तेजन क्रिया (सुलभ)

ड. प्रकाश संश्लेषण क्रिया

16.हिरवा साप या गटात येतो:

A. परपोशी

B. विघटक

C. मांसाहारी

D. स्वयंपोशी (सुलभ)

17.अन्नसाखळीत हिरव्या वनस्पती या स्तरावर असतात.

A. तृतीयक

B. प्राथमिक उत्पादक

C. दुय्यम ग्राहक

D. श्रेणीबद्ध ग्राहक (साधारण)

18.लांडगा कोणत्या प्रकारच्या अन्नसाखळीत येतो?

A. शाकाहारी

B. मांसाहारी

C. मिश्रहारी

D. उत्पादक (सुलभ)

19.जंगलातील उष्णता आणि तापमान नियंत्रित करण्यास मदत करणारे घटक हे आहेत.

A. गिधाडे

B. झाडे

C. साप

D. मातीतील कीटक (सुलभ)

II.योग्य उत्तरांसह रिकाम्या जागा भरा

20 ____________श्वसनासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन पुरवतात (सुलभ)

21. अरण्ये ___________ नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. (सुलभ)

22. ______________ प्राण्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अवशेषांचे पुनर्वापर करतात. (सुलभ)

23.जंगलातील प्राणी एकमेकावर ___________असतात. (सुलभ)

24.___________हे वन जैवविविधतेचे संवर्धन करण्यास मदत करते. (सुलभ)

25.___________हे मानवांसाठी ऑक्सिजन पुरविण्याचे मुख्य स्रोत आहे. (सुलभ)

26.जंगलातील _________ प्राणी पर्यावरणाशी संतुलित असतात (सुलभ)

27.जंगले _________ धूप होण्यापासून रक्षण करतात. (सुलभ)

28. ____________जंगलाला वाढण्यास आणि पुनरुत्पादित करण्यास मदत करतात. (सुलभ)

29.जंगले _______,__________आणि __________इ.च्या गुणवत्तेवर परिणाम करतात. (सुलभ)

30.____________ जंगलात वाढणाऱ्या वनस्पतींना पोषक तत्वे पुरवण्यास मदत करतात.(सुलभ)

III. जोड्या जुळवा (साधारण)

31.

	A	B
1.	गाय	i.कुजवणारे
2.	वाघ	ii.अन्न उत्पादक
3.	विघटक	iii.शाकाहारी प्राणी
4.	झाडे	iv.मांसाहारी प्राणी

IV. खालील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात किंवा एका वाक्यात लिहा.

32. अदृश्य कीटक कोणत्या स्थरावर आढळतात? (साधारण)

33.जंगलांमध्ये मातीची धूप होवू नये म्हणून कोण रक्षण करतात. (साधारण)

34.जंगलात बुरशीची भूमिका काय आहे? (साधारण)

V.खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा

35.उत्पादक आणि उपभोगी यांच्यातील फरक लिहा (साधारण)

36.हिरव्या वनस्पती अन्न कसे करतात? (साधारण)

37.अन्नसाखळीची दोन उदाहरणे लिहा (साधारण).

38.जंगलांना आपली जीवनरेखा असे का म्हटले ? (साधारण)

39.जंगलतोडीमुळे पाऊसकमी पडतोयाचे समर्थन तुम्ही कसे करू शकता? (साधारण)

40.जंगले मातीची धूप कशीरोखतात? (कठीण)

41.जंगलांमध्येऑक्सिजनचे प्रमाण जास्त का असतो? (कठीण)

42.जंगलांना हिरवे फुफ्फुस असे का म्हणतात? (कठीण)

43.अंतर्जल पातळी वाढवण्यात जंगलांची भूमिका काय आहे? (साधारण)

44.जंगले ध्वनि प्रदूषण कसे नियंत्रित करतात? (साधारण)

VI. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा

45.जंगलांमध्ये आढळणाऱ्या तीन वेग वेगळ्या जैविक घटकांची उदाहरणे द्या ? (कठीण)

VII. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा

46.जंगलांमुळे मानवांना होणारे चार फायदे लिहा? (कठीण)

47.पर्यावरण संतुलन राखण्यात जंगलांची भूमिका स्पष्ट करा? (कठीण)

48.जलचक्रात जंगलांची भूमिका स्पष्ट करा? (कठीण)

49.जल चक्राची आकृती काढून माहिती लिहा? (कठीण)

VIII. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. पाच गुणांचे प्रश्न.

50.जंगलांचे संवर्धन या विषयावर एक निबंध लिहा ? (कठीण)

51.वन संवर्धनाच्या गरजेवर एक निबंध लिहा? (कठीण)

52.जंगल हे जीवन आणि चैतन्य यांनी भरलेले एक सक्रिय सजीव प्राणी आहे हे स्पष्ट करा? (कठीण)

प्रकल्पावर आधारित प्रश्न

53.अन्नसाखळी प्रकल्प.

हिरवा वाटाणा कीटकहिरवा सापगरुड. ⟶ ⟶ ⟶

या अन्न साखळीचे निरीक्षण करा आणि प्रश्नांची उत्तरे द्या.

A. मुख्य उत्पादक कोण आहे?

B. दुय्यम उपभोगक(ग्राहक) कोण आहे? C.अंतिम उपभोगक(ग्राहक) कोण आहे? (कठीण)

54.रेखाचित्र कृती.

जंगलाचे संकल्पनात्मक चित्र देवून, झाडे, पक्षी, प्राणी, माती ओलखण्यास सांगणे? (कठीण)

55.जंगलाचे चित्र काढण्यास सांगूनखालील गोष्टी दाखविण्यास सांगणे

पाऊस , झाडांची मूळे , जमिनीत पाणी झिरपणे. (कठीण)

गणितीय डेटा-आधारित प्रश्न

56.एका जंगलात 10000 झाडे असतात. प्रत्येक झाड दरवर्षी 100 लिटर ऑक्सिजन सोडते. तर त्या जंगलाचे एकूण ऑक्सिजन उत्पादन किती असेल? (कठीण)

57.एकूण 400 हेक्टर जंगल असलेलेल्या क्षेत्रापैकी 25% जंगल तोडले असता किती हेक्टर जंगल शिल्लक राहील? (कठीण)

पाठ – 13

सांडपाण्याची कहाणी

अध्ययन निष्पत्ती-

1. सांडपाण्याच्या पुनर्वापराचे व शुद्धीकरणाचे महत्त्व जाणून घेतात.
2. पाण्याचे महत्व जाणून घेऊन त्याचे विवरण करतात.
3. पृथ्वीवरील पाण्याचे प्रमाण त्याची उपलब्धता याविषयी वर्णन करतात.
4. आंतर्जल व पाण्याचा योग्य वापर याविषयी जाणून घेतात.

I. योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा

1. यातून वाहणारे पाणी हे सांडपाण्याचा स्त्रोत नाही. (सुलभ)

.A सिंक B.स्नानगृहे C.शौचालय D.नदी

2. दूषित घटकांचे विभक्तीकरण करून शुद्धीकरण करता येणारे पाणी...... (सुलभ)

A . समुद्राचे पाणी B. सांडपाणी C.महासागराचे पाणी D.वरील सर्व

3. विश्व जलदिन या दिवशी साजरा करतात. (सुलभ)

A. 22 मार्च B .15 एप्रिल C.18 ऑगस्ट D. 26 जानेवारी

4. पाणी जलस्त्रोतामध्ये येण्यापूर्वी किंवा त्याचा पुन्हा वापर करण्यापूर्वी त्यातील दूषित घटक काढून टाकण्याची क्रिया. (सुलभ)

A. बाष्पीभवन B.पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन

C.पाण्याचे शुद्धीकरण D.पाण्याचे पुनर्भरण

5. सांडपाण्यावर केली जाणारी प्रक्रिया- (सुलभ)

A.सांडपाणी शुद्धीकरण B.पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण

C.नदीच्या पाण्याचे शुद्धीकरण D.वरील सर्व

6. सांडपाण्यामध्ये हे घटक असतात. (सुलभ)

A . प्रदूषके B.विद्राव्य प्रदूषके C.तरंगणारी प्रदूषके D.वरील सर्व

7. दैनंदिन जीवनातील शुद्ध पाण्याचे उपयोग- (सुलभ)

A.अंघोळीसाठी B.पिण्यासाठी C.स्वयंपाकासाठी D.वरील सर्व

8. शौचालयातील मल व पाणी यांची विल्हेवाट करण्याची पर्यायी व्यवस्था - (सुलभ)

A. पिटलॅटरीन B. विघटक खड्डे C.रासायनिक शौचालय D.वरील सर्व

9. 2016 मध्ये भारत सरकारने प्रारंभ केलेल्या स्वच्छ भारत अभियान या योजनेचे उद्दिष्ट – (सुलभ)

A.प्रत्येकासाठी शौचालयाची व्यवस्था B.सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन

C.सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता D.वरील सर्व

10. दूषित पाण्यामुळे हा रोग होत नाही. (सुलभ)
A.कॉलरा B.टाइफाइड C.बेरीबेरी D. अतिसार

11. या जिवाणूमुळे किंवा बॅक्टेरियामुळे कॉलरा रोगाचा प्रसार होतो. (सुलभ)
A.व्हायब्रिओ कॉलरी B.साल्मोनेला टायफी C.प्रोटोझुआ D.मायक्रो बॅक्टेरिया

12. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पामध्ये मोठे घटक बाजूला करण्याची पद्धत - (सामान्य)
A.सांडपाणी लोखंडी सळ्यांच्या जाळीतून सोडणे
B.बारीक खडे व वाळू वेगळी करणाऱ्या टाकीत सोडणे
C.मध्यभागी उतार असणाऱ्या टाकीमध्ये पाणी सोडणे
D.पाण्यात पंपाने हवा सोडणे

13. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पामध्ये निर्मलिकृत पाण्यामध्ये हवा सोडण्याचे कारण- (सामान्य)
A.घनरूपातील अशुद्ध घटक वेगळे करण्यासाठी
B.वायवीय जिवाणू (एरोबिक बॅक्टेरिया)ची वाढ होण्यासाठी
C.गाळ वेगळा करण्यासाठी
D.जैविक घटक वेगळे करण्यासाठी

14. सार्वजनिक स्थळांची स्वच्छता राखण्यासाठी.. (सुलभ)
A.जिकडे तिकडे कचरा टाकू नये B.कचरा पसरू न देणे
C.कचराकुंडी चा वापर करणे D.वरील सर्व

15. जलचर प्राणी व वनस्पती यांची संख्या कमी होण्याचे कारण (सामान्य)
A.नायट्रोजनची कमतरता B.हायड्रोजनची कमतरता
C.पाण्यात विद्राव्य ऑक्सिजनची कमतरता D.क्लोरीनची कमतरता

16. विश्व जलदिन या दिवशी साजरा करतात. (सुलभ)
A. 22 एप्रिल B. 22 जून C. 22 मार्च D. 22 ऑगस्ट

17. पाणी हे एक..........आहे. (सुलभ)
A. घनवस्तू B. प्लाझ्मा C. वायू D. संयुग

18. पृथ्वीवरील पाण्याचे अंदाजे प्रमाण (सामान्य)
A.90% B.10% C.27% D.71%

19. पाणी हे एक संयुग आहे हे सिद्ध करणारा शास्त्रज्ञ (सामान्य)
A.हेन्री केव्हेंडीश B. लीवाजीअर C. रॉबर्ट बॉईल्स D.रॉबर्ट हूक

20. या तापमानाला पाण्याची घनता सर्वाधिक असते .
A.4°C B.0°C ते 4°C C.5°C ते 0°C D.100°C

21. शुद्ध (पावसाच्या) पाण्यामध्ये.... असत नाहीत. (सामान्य)

A.क्षार B.खनिजे C.आयन्स D. वरीलपैकी कोणतेही नाही

22. हे अत्यंत शुद्ध स्वरूपातील पाणी आहे. (सामान्य)

A.विहिरीचे पाणी B.खनिजयुक्त पाणी C.उर्ध्वपातीत पाणी D.पावसाचे पाणी

23. पृथ्वीवरील पिण्याच्या पाण्याचे प्रमाण

A.0.6% B.0.06% C.0.006% D. 6%

24. जलचक्राशी असंबंधित घटक (सुलभ)

A.अंतर्जल B.कृषी C.बाष्पीभवन D.ढग

25. पाण्याच्या प्रवाहाचा दर मोजण्याचे एकक (सुलभ)

A. मायक्रोवेव्ह B .ओहम मीटर C.डिग्री सेल्सियस D.क्युसेक

26. अंतर्जल पातळीमध्ये घट होण्याचे प्रमुख कारण(सुलभ)

A.अरण्यनाश B.शेती C.बाष्पीभवन D.दुष्काळ

27. जलचक्रामध्ये पाण्याची ही अवस्था दिसून येत नाही. (सुलभ)

A.घनरूप B.प्लाझ्मा C.द्रवरूप D.वायुरूप

28. पावसाच्या पाण्याचा वापर करून अंतर्जलपातळी वाढवण्यासाठी तुझ्या शाळेत राबविलेला उपक्रम

A.डोंगर उतारावरील शेती B.ठिबक सिंचन पद्धत

C.पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन D.कुपनलिका निर्मिती (सामान्य)

29. पाणी जिरविणे म्हणजे..... (सामान्य)

A. पाणी जमिनीवरून वाहने B.जमिनीमध्ये पाणी झिरपणे

C. मातीच्या वरच्या थरामध्ये पाण्याचे शोषण होणे D. जमिनीवर पाणी साठून राहणे

30. अंतर्जलपातळीच्या खाली खडकांमध्ये साठलेल्या पाण्याला असे म्हणतात. (सुलभ)

A.अंतर्जल B.सांद्रीभवन C.बाष्पीभवन D.जलधारक

31. पाणी दूषित करणारी प्रदूषके पाण्यात मिसळण्याची क्रिया (सुलभ)

A.मातीचे प्रदूषण B.जलप्रदूषण C.जलचर प्राण्यांचे पोषण D.परिसर संरक्षण

32. शरीरामध्ये पाण्याचा अंश कमी होणे म्हणजे (सुलभ)

A.क्षारांचे प्रमाण वाढणे B.क्षारांचे प्रमाण कमी होणे

C. हायड्रेशन D.डीहायड्रेशन

33. बर्फ पाण्यावर तरंगतो. याचे कारण(सामान्य)

A.बर्फाची घनता पाण्याच्या घनतेपेक्षा जास्त असते

B.बर्फाची घनता पाण्याच्या घनतेपेक्षा कमी असते

C. A व B दोन्ही बरोबर

D. वरीलपैकी कोणतेही नाही

34. पाणी शुद्धीकरणाची सोपी पद्धत (सुलभ)

A.क्लोरीनेशन B.फ्लोरिनेशन C.वायूविजन D.फिल्टरेशन

35. फक्त ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांनाच पाण्याच्या कमतरतेच्या समस्येला तोंड द्यावे. लागते हे विधान

A.बरोबर आहे B.चूक आहे

C.काही वेळा बरोबर आहे D.काही वेळा चुकीचे ठरते (सुलभ)

36. कुपनलिका किंवा जमिनीतून पाणी मिळण्याच्या पाण्याचा स्त्रोत (सुलभ)

A.पंप B. अंतर्जल C नदी D.सरोवर

37. योग्य विधान ओळखा. एकूण पाणी – (सामान्य)

A .जगातील नद्या व सरोवरामध्ये स्थिर आहे

B.भूगर्भामध्ये स्थिर आहे

C.समुद्र व महासागरामध्ये आहे

D.संपूर्ण जगामध्ये स्थिर आहे

38. पाण्यामध्ये आर्सेनिक रासायनिक घटक मिसळण्याचे मुख्य कारण (सुलभ)

A.आम्लिय पाऊसB.रासायनिक खतांचा वापर C.अतिवृष्टी D.दुष्काळ

39. ठिबक सिंचन पद्धत म्हणजे (सामान्य)

A.योग्य प्रमाणामध्ये पाण्याचा वापर करणे B.पाण्याचा अपव्यय

C.पाण्याचा दुरुपयोग D.पाण्याचा वापर टाळणे

40. दूषित पाण्यामुळे हा आजार होत नाही. (सुलभ)

A.टायफाईड B.अतिसार C.कॉलरा D.दमा

41. दूषित पाणी म्हणजे – (सुलभ)

A.नदीतून वाहणारे पाणी

B.पावसाचे पाणी

C.नळातून ठिबकणारे पाणी

D.कपडे धुतल्याने त्यातील अशुद्ध घटक मिश्रित पाणी

42. पाण्याच्या कमतरतेची समस्या निर्माण होण्यास हा घटक कारणीभूत नाही.(सामान्य)

A.औद्योगीकरण B.लोकसंख्या वाढ

C.अतिवृष्टी D.पाण्याच्या स्त्रोतांचे अयोग्य व्यवस्थापन)

43. ग्रामीण भागातील लोकांनी NGO च्या सहाय्याने पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन करण्याचा निर्धार केलेले वर्ष
A.1989 B.1982 C.1984 D.1988 (सामान्य)

44. पावसाच्या पाण्याचे संग्रहण करण्याची पारंपारिक पद्धत (सुलभ)
A.कूपनलिका B.पाण्याच्या टाक्या C.पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन D.खड्डे

45. वाक्य पूर्ण करा. आपले पाणी म्हणजे आपले......... (सुलभ)
A.जीवन B.यश C.अपयश D.त्रास

46. पृथ्वीवरील सर्वाधिक पाणी येथे संग्रहित आहे. (सामान्य)
A.महासागर B.नदी C.सरोवर D.हिमनद्या

47. जलचक्रामध्ये समाविष्ट क्रिया क्रमाने लिहा. (कठीण)
A.पर्जन्यवृष्टी, सांद्रीभवन,बाष्पीभवन
B.बाष्पीभवन, सांद्रीभवन, पर्जन्यवृष्टी
C.बाष्पीभवन, पर्जन्यवृष्टी, सांद्रीभवन
D.सांद्रीभवन, पर्जन्यवृष्टी,बाष्पीभवन

48. ढगांमधून पाण्याचे थेंब पृथ्वीवर पडण्याची जलचक्रातील क्रिया(सामान्य)
A.सांद्रीभवन B.बाष्पीभवन C. संप्लवण D.पर्जन्यवृष्टी

49. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पामध्ये प्रदूषके वेगळी करण्यासाठी वापरली जाणारी सामान्य प्रक्रिया
A.बाष्पीभवन B.ज्वलन C.गाळण D.गोठणे (सामान्य)

50. दूषित पाण्यामुळे हा रोग होत नाही. (सामान्य)
A.कॉलरा B.रक्तदाब C.कावीळ D. अतिसार

51. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पाचा प्राथमिक उद्देश (सामान्य) A.विद्युत निर्मिती
B.पाण्यापासून खनिजे मिळवणे
C.पाण्याचा पुनर्वापर किंवा सुरक्षित विल्हेवारीसाठी पाण्यावर विविध क्रिया करून शुद्धीकरण करणे
D.सांडपाण्याचे संग्रहण करणे

52. इन फिल्टरेशन म्हणजे (सामान्य)
A.पाणी मातीमध्ये प्रवेश करण्याची क्रिया B.पृथ्वीवर किंवा जमिनीवर पाण्याचे वहन
C.मातीतून पाण्याचे बाष्पीभवन होण्याची क्रिया D.नदीतून पाणी वाहणे

53. जलधारक म्हणजे – (कठीण)
A.एक प्रकारची ढगांची रचना B.भूगर्भामध्ये पाण्याचा साठा करणाऱ्या खडकांचा थर किंवा गाळ
C.नदी किंवा सरोवर यासारखे पाण्याचे स्त्रोत D.वनस्पतीच्या मुळांकडून पाण्याचे शोषण

II. रिकाम्या जागा भरा.

54. पाण्यातून प्रदूषके वेगळी करण्याच्या क्रियेला........ म्हणतात. (सामान्य)

55. पाण्याच्या तळाशी साचलेल्या सक्रिय गाळामध्ये सुमारे ....इतके पाणी असते.(सामान्य)

56. विश्व जल दिन ....या दिवशी साजरा करतात. (सामान्य)

57. पाणी शुद्धीकरणाची सर्वात सोपी पद्धत ....ही आहे.

58. प्रदूषके पाण्यात मिसळण्याची क्रिया म्हणजेच..............

59. पाण्याचे शुद्धीकरण म्हणजे पाण्यातील.......... वेगळे करणे . (सामान्य)

60. घरगुती वापरातून बाहेर पडणाऱ्या पाण्याला........... म्हणतात. (सामान्य)

61. कोरडा गाळ ....म्हणून वापरला जातो. (सामान्य)

62. गटारीतून सांडपाणी वाहण्यास .... व........... मुळे अडचणी निर्माण होतात. (सामान्य)

III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

63. सांडपाण्याचा पुनर्वापर करणे शक्य आहे का?(सामान्य)

64. सांडपाणी म्हणजे काय? (सामान्य)

65. गोड्या पाण्याचा किंवा स्वच्छ पाण्याचा उपयोग व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट करण्यासाठी काय केले पाहिजेत? (सामान्य)

66. पावसाचे पाणी सांड पाण्यामध्ये मिसळणे शक्य आहे का? (सामान्य)

67. पाण्याच्या शुद्धीकरणापूर्वी व शुद्धीकरणा नंतर पाण्यामध्ये काय फरक दिसून येतो?(कठीण)

68. सांडपाण्याच्या शुद्धीकरणा नंतर मिळालेल्या पाण्याचा उपयोग कशासाठी करू शकतो? (कठीण)

69. आपण पाण्याचे निर्जंतुकीकरण कसे करू शकतो ? (सामान्य)

70. पाण्यामध्ये वायुविजन करणे गरजेचे आहे. कारण लिहा. (कठीण)

71. टाकाऊ पदार्थ पाण्याच्या स्त्रोतांमध्ये टाकल्यास किंवा सोडल्याने काय परिणाम होतो? (सामान्य)

72. आपण आपल्या घरामध्ये वापरत असलेल्या वस्तूंपैकी काही वस्तू फेकून न देता त्यांचा पुनर्वापर कसा करता येईल? अशा तीन वस्तूंची नावे लिहा. (कठीण)

73. विद्युत उपकरणांचा कचरा किंवा त्यांचे निरुपयोगी टाकाऊ पदार्थ यांची विल्हेवाट कशी करता येईल? (कठीण)

74. स्वच्छता व आजार किंवा रोग या मधील संबंध स्पष्ट करा. (कठीण)

75. घरामध्ये स्वच्छतेच्या सवयींचे पालन करताना प्रामुख्याने कोणत्या सवयीचे पालन करावे? (सामान्य)

76. भारतामध्ये दूषित पाण्यामुळे होणारा सर्वसामान्य रोग कोणता? (सामान्य)

IV. पुढील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

77. सांडपाणी म्हणजे काय? (सामान्य)

78. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपल्या निदर्शनास येणाऱ्या टाकाऊ पदार्थांची यादी करा. (सामान्य)

79. सांडपाण्यामध्ये सामान्यपणे आढळणारी प्रदूषके कोणती? (सामान्य)

80. सांडपाण्यातील प्रदूषकांचे वर्गीकरण कसे कराल? (कठीण)

81. सेवर म्हणजे काय? (सामान्य)

82. भूमिगत गटारामधून वाहणाऱ्या सांडपाण्यावर कोणतीच प्रक्रिया न करता तेपाणी पाण्याच्या स्त्रोतांमध्ये सोडल्यास त्याचे काय परिणाम होतील? (कठीण)

84. तेल किंवा इतर स्निग्ध पदार्थ गटारीमध्ये टाकू नये. कारण लिहा.(कठीण)

85. स्वच्छतेच्या सवयींचा अवलंब न केल्यास दूषित पाण्यामुळे कोणत्या रोगांचा प्रादुर्भाव होतो?(कठीण)

86. पाण्याच्या स्त्रोतां जवळ किंवा उघड्यावर मल विसर्जन करू नये. स्पष्ट करा. (कठीण)

V. पुढील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा

87. भूमिगत गटारांची आवश्यकता का आहे? (सामान्य)

88. घरगुती वापरामध्ये निरुपयोगी टाकाऊ पदार्थ व इतर प्रदूषकांचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. कारण लिहा. (कठीण)

89. पाण्याचे स्त्रोत दूषित करणारी घरगुती प्रदूषके कोणती? (कठीण)

VI. पुढील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा.

90. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पामधील विविध टप्प्यांचे वर्णन करा. (कठीण)

91. गटारीच्या पाण्यामध्ये घरगुती टाकाऊ पदार्थ मिसळणार नाहीत याची काळजी आपण कशी घ्यावी? (कठीण)

92. स्वच्छ भारत अभियान या कार्यक्रमाच्या प्रमुख उद्देशांची यादी करा. (कठीण)

- ## नमुना उत्तरे:

घटक – 1

वनस्पतींमधील पोषण

I. बहुपर्यायी उत्तरे:

1. A वनस्पती

2. C पाने

3. D ऑक्सिजन

4. A सौर ऊर्जा

5. A कस्कुटा

6. D शेवाळ

7. A क्लोरोफिल

8. B शवोपजीवीपोषण

9. C कस्कुटा

10. C घटपर्णी

11. A शवोपजीवी पोषण

12.B नैट्रोजन

13. A रायझोबियम

14. B कार्बोहैड्रेट्स

15. A बरोबर, B बरोबर, C बरोबर

16. B स्वयंपोषी

17. A स्टार्च

18. A हिरवे रंगद्रव्य

19. D कार्बन डायऑक्साइड आणि ऑक्सिजन

20. B पेशी

21. A पर्णरंध्र

22. B पाने

22. C पाने

24. A वाळवंट

25. D बाष्पोत्सर्जन

26. B पर्णरंध्र

27. B घटपर्णी

28. A शेवाळ

II. खालीलजोड्याजुळवा:

29. 1 – B, 2 – C, 3 – A, 4 – E, 5 – D

30. 1 – C, 2 - D, 3 – A, 4 – B

III. संबंधित शब्द लिहा:

31 क्लोरोफिल, स्वयंपोषी, प्रकाशसंश्लेषण

32.घटपर्णी, कस्कुटा, स्वयंपोषीपोषण नाही

33 पाणी, प्रकाश, CO_2, क्लोरोफिल

IV. रिकाम्या जागा भरा:

34 कार्बन डायऑक्साइड

35 घटपर्णी

36 ऑक्सिजन

37 प्रकाश

38 प्रकाशसंश्लेषण

39 क्लोरोफिल

40 परपोषी

V. चूक की बरोबर:

41 बरोबर

42 चूक

43 चूक

44 बरोबर

45 चूक

46 चूक

47 बरोबर

48 चूक

49 बरोबर

VI. एका वाक्यात उत्तरे:

50.वनस्पती अन्न तयार करण्यासाठी कार्बन डायऑक्साइड वायूचा वापर करतात

51.प्रकाशसंश्लेषणात ऑक्सिजन उपउत्पादन म्हणून सोडले जाते

52.कस्कुटा ही एक हिरवी वनस्पती आहे –चूक, ती एक हिरवी नसलेली परपोषीवनस्पती आहे

53.घटपर्णीही एक किटकभक्षी वनस्पती आहे

54. कांही सजीव एक दुस-या सोबत राहून आपले पोषक घटक व निवारा वाटून घेतात याला सहजीवी संबंध म्हणतात.

55. ज्या पध्दतीत सजीव आपल्याला लागणारे पोषक घटक मृत अथवा कुजणा-या पदार्थांपासून मिळवतात याला शवोपजीवी पोषण म्हणतात.

56.किटकभक्षी वनस्पतींची उदाहरणे : घटपर्णी , ड्रासेरा.

57. दगड फूलामध्ये सहजीवी संबंधाने पोषण होते.

58. वनस्पतींना नैट्रोजन शोषण्यास मदत करणारे जीवाणू म्हणजे रायझोबियम.

59. शेवाल हिरव्या रंगाचे असतात कारण त्यात क्लोरोफिल असते.

VII. दोन-तीन वाक्यांत उत्तरे:

60. सूर्यप्रकाश, पाणी, कार्बन डायऑक्साइड आणि क्लोरोफिलच्या मदतीने वनस्पती अन्न तयार करतात त्या प्रक्रियेला प्रकाश संश्लेषण म्हणतात.

61. क्लोरोफिल हे वनस्पतींच्या पानांमध्ये आढळणारे हिरवे रंगद्रव्य आहे जे सूर्यप्रकाश शोषण्यास मदत करते आणि प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावते.

62. ही एक हिरवी नसलेली वनस्पती आहे जी स्वत:चे अन्न तयार करू शकत नाही. ती इतर वनस्पतींवर वाढते आणि त्यांच्यापासून अन्न मिळवते. या कारणास्तव, ती एक परपोषीवनस्पती आहे.

63. क्लोरोफिल हा वनस्पतींच्या हिरव्या रंगासाठी जबाबदार असलेला एक रासायनिक पदार्थ आहे आणि तो प्रकाशसंश्लेषणात सौरऊर्जा शोषण्यास मदत करतो.

64. सूर्यप्रकाश, पाणी, कार्बन डायऑक्साइड, क्लोरोफिल.

65.कारण वनस्पती प्रकाश, क्लोरोफिल , पाणी आणि कार्बन डायऑक्साइड वापरून स्वत:चे अन्न तयार करतात.

66. त्यात क्लोरोफिल नसते आणि प्रकाशसंश्लेषण करू शकत नाही; म्हणून, ती एक परपोषीवनस्पती आहे.

VIII. तीन-चार वाक्यांत उत्तरे:

67. आवश्यक घटक:

- सूर्यप्रकाश
- पाणी
- कार्बन डायऑक्साइड
- क्लोरोफिल
- उत्पादने:अन्न (ग्लुकोज)
- ऑक्सिजन

68.स्वयंपोषी वनस्पती परपोषी वनस्पती

स्वतःचे अन्न तयार करतात इतर वनस्पतींवर वाढून अन्न मिळवतात.

हिरवे रंगद्रव्य (क्लोरोफिल) असते क्लोरोफिल नसते किंवा खूप कमीअसते.

उदा: हिरव्या वनस्पतीउदा:घटपर्णी , कस्कुटा

69. हिरव्या नसलेल्या वनस्पतींमध्ये क्लोरोफिल नसते→प्रकाशसंश्लेषण शक्य नाही.

- हे इतर वनस्पतींवर वाढतात आणि त्यांच्यापासून पोषक तत्वे मिळवतात.
- ते परपोषी पोषण पद्धतींचे अनुसरण करतात.

उदा:घटपर्णी , कुस्कुटा, इ.

70. प्रकाश संश्लेषणात प्रकाश खूप महत्वाची भूमिका बजावतो. वनस्पती क्लोरोफिलच्या मदतीने

सूर्यप्रकाश शोषून घेतात.

ही प्रकाश ऊर्जा पाणी आणि कार्बन डायऑक्साइडच्या रासायनिक बदलांसाठी ऊर्जा प्रदान करते. यामुळे ग्लुकोज (अन्न) आणि ऑक्सिजन तयार होते.

IX. चारपाच वाक्यांत उत्तरे:

71.प्रकाश संश्लेषण ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे हिरव्या वनस्पती सूर्य प्रकाशाच्या मदतीने स्वतःचे अन्न तयार करतात. या प्रक्रियेसाठी:

- हिरवे रंगद्रव्य (क्लोरोफिल)
- पाणी (मातीतून)
- कार्बन डायऑक्साइड (हवेतून)
- आणि सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. या प्रक्रियेत वनस्पती ग्लुकोज (अन्न) आणि ऑक्सिजन तयार करतात. सामान्य समीकरण:
- $CO_2 + H_2O \longrightarrow$ (सूर्यप्रकाश)→अन्न ($C_6H_{12}O_6$) + O_2

72. घटपर्णीही एक परपोषी वनस्पती आहे. त्याची पाने घटाच्या आकाराची असतात आणितोंडावर उघडझाप करणारे झाकण असते सुरईच्या भागात किटक येतो तेव्हा झाकण बंद होते.त्या भागात पाचक रसाने तो किटक पचवला जातो. ही वनस्पती किटकभक्षी वनस्पती मानली जाते कारण ती अन्नासोबत प्रथिने आणि इतर पोषक तत्वे मिळविण्यासाठी किटकांना खाऊन पोषण करून घेते.

73. कस्कुटा वनस्पती प्रकाशसंश्लेषण करू शकत नाही.

- ती त्याच्या यजमान वनस्पतीवर वाढते आणि त्याचा रस शोषून घेते.
- ती यजमान वनस्पतीद्वारे स्वतःच्या मुळांमधून अन्न मिळवते.

74. प्रकाश, विशेषतः सूर्यप्रकाश, प्रकाश संश्लेषणात महत्त्वाची भूमिका बजावते.

- सौरउर्जेच्या मदतीने, पाणी आणि CO_2 यांची क्रिया घडून येते .
- यामुळे ग्लुकोज (साखर) तयार होते.
- प्रकाशाशिवाय, ही प्रक्रिया शक्य नाही.

प्रकाश→रासायनिक उर्जेमध्ये रूपांतरीत होतो.

75. किटकभक्षी वनस्पती सहसा अशा मातीत वाढतात जिथे नैसर्गिकरित्या नैट्रोजनची कमतरता असते. किटकांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यांना पकडण्यासाठी त्यांच्या विशेष पानांचा वापर करतात. त्यानंतरते या किटकांना सूरईसारख्या भागात असलेल्या पाचक रसात पचवतात . अशा प्रकारे, वनस्पती आपल्याला आवश्यक असलेली पोषक तत्वे मिळवतात.

X .दीर्घोत्तरी उत्तरे – ५ गुण :

76. प्रकाश संश्लेषण प्रक्रियेत, हिरव्या वनस्पती पाणी आणि कार्बन डायऑक्साइड पासून अन्न (ग्लुकोज) तयार करण्यासाठी सूर्यप्रकाशाचा वापर करतात. या प्रक्रियेत, ऑक्सिजन तयार होतो.

आवश्यक घटक:

- सूर्यप्रकाश
- पाणी
- कार्बन डायऑक्साइड
- क्लोरोफिल

उत्पादने:

- ग्लुकोज
- ऑक्सिजन

- समीकरण:

$6CO_2 + 6H_2O \longrightarrow$ (सूर्यप्रकाश)$\longrightarrow C_6H_{12}O_6 + 6O_2$



चित्र 1.3 प्रकाश संश्लेषण क्रिया दर्शविणारे चित्र

- CO_2 पानात प्रवेश करत आहे
- जमिनीपासून वर वाहणारे पाणी
- सूर्यप्रकाश पडणे
- ऑक्सिजनमुक्त होतआहे

77. जर प्रकाश नसता तर वनस्पती अन्न तयार करू शकल्या नसत्या.

- प्राणी आणि मानव अन्नाशिवाय तडफडतील.
- ऑक्सिजन उत्पादन होणार नाही.
- हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढेल.
- वातावरणातील जीवजंतूंचा नाश होईल.

78. (सर्जनशील लेखन):

- मी कीटकांना आकर्षित करेन.
- माझ्या घागरीच्या आकाराच्या पानात उडणारे कीटक पडून त्यात अडकतील.
- त्यानंतर मी त्या कीटकांना पाचक रसाने पचवून पोषक तत्वे शोषून घेईन.
- या प्रक्रियेने मला माझ्या आहारात प्रथिने मिळतील.
- मी हिरवी वनस्पती असलोतरी मी पूर्णपणे स्वयंपोषी नाही.

79. वनस्पती स्वतःचे अन्न तयार करतात – ते आहाराचेच मूलस्रोत आहेत.

- प्राणी आणि मानव सर्व वनस्पतींवर अवलंबून असतात.
- प्रकाश संश्लेषणाद्वारे ऑक्सिजनमुक्त होतो – तो श्वसनासाठी आवश्यकआहे.
- कार्बन डायऑक्साइडचा वापर – पर्यावरणाचे संतुलन.
- वनस्पतींशिवाय , अन्नसाखळी तुटते.

80. आहाराचेस्रोत: वनस्पती→धान्ये, फळे, भाज्या.

- प्राणी→वनस्पतींवर अवलंबून→मानव अवलंबून.
- ऑक्सिजन→श्वसनासाठी.
- कार्बन डायऑक्साइड पातळी नियंत्रण.
- पर्यावरण संरक्षण .
- वनस्पतींशिवाय जीवन अशक्य आहे.

पाठ -2.

प्राण्यांचे पोषण

I. योग्य पर्याय निवडा

1) D. वरील सर्व

2) D. वरील सर्व

3) A. कार्बोहायड्रेट्स

4) A. लहान आतडे

5) C. यकृत

6) C. iii, i, v, ii, iv

7) C. रूमेन

8) A. छद्मपाद

9) D. सेल्युलोज

10) A. शोषण

11) B. अन्नासोबत जठरात आलेल्या अनेक हानीकारक जीवाणूंना मारते.

12) A. शोषणेंद्रिये (व्हिली)

13) B. दुधाचे दात

14) A. पाचक

15) B. विवरे/रिक्तिका

16) A. परपोषी

17) B. यकृत

18) D. 1-iv , 2-ii , 3-i, 4-iii

19) C. यकृत

20) B. 1-v, 2-i , 3-iv , 4-ii , 5-iii

21) B. मलाशय

22) D. लहान आतडे.

23) C. मोठे आतडे

24) C. यकृत

25) C. जीवाणू

26) A→चूक

B→बरोबर

C→बरोबर

D→बरोबर

27) A→लहान आतडे

B→ मोठे आतडे.

II. एका वाक्यात उत्तर द्या.

28) जे प्राणी फक्त वनस्पतींना खाऊन जगतात त्यांना शाकाहारी प्राणी म्हणतात.

29) जे प्राणी अन्नासाठी इतर प्राण्यांवर अवलंबून असतात; त्यांना मांसाहारी प्राणी म्हणतात.

30) होय. कारण ससा हा थेट वनस्पती खाणारा प्राणी आहे.

31) अन्नातील संकीर्ण घटकांचे साध्या घटकांमध्ये रुपांतर होण्याच्या प्रक्रियेला पचन म्हणतात.

32) फुलपाखरू, मधमाशी इत्यादी.

33) फुलांमधील मध/रस (नेक्टर)

34) शरीरात अन्न घेण्याच्या क्रियेला अंतर्ग्रहण म्हणतात.

35) माणसे, मांजर, कुत्रे इत्यादी

36) होय. अस्वल मिश्राहारी आहे. कारण ते अन्नासाठी वनस्पती व प्राणी दोघांवरही अवलंबून असते.

37) i) अंतर्ग्रहण ii) पचन iii) अभिशोषण iv) एकजीव होणे (v)मलविसर्जन

38) लाळाग्रंथी

39) पुढचे पटाशीचे दात (कात्रे दात), सुळे, चर्वणाच्या उपदाढा व चर्वणाच्या दाढा.

40) यकृत

41) जठर.

42) पचन झालेले अन्न आतड्याच्या भित्तीकेवरील रक्तवाहिन्यात जाते या प्रक्रियेला अभिशोषण असे म्हणतात.

43) पित्तरस

44) यकृत

45) लहान आतड्याच्या आतील भित्तिकेवर असणाऱ्या बोटासारख्या रचनांना शोषणेंद्रिये म्हणतात.

46) लहान आतडे

47) हायड्रोक्लोरिक आम्ल

48) लहान आतड्याची लांबी 7.5 मीटर व मोठ्या आतड्याची लांबी 1.5 मीटर असते.

49) अन्ननलिकेची लांबी माणसाच्या उंचीवर अवलंबून असते. प्रौढांमध्ये तिची लांबी अंदाजे 25 ते 30 सेंटीमीटर असते.

50) अन्ननलिका अन्न तोंडातून जठरापर्यंत पोहोचण्यास मदत करते.

51) पचन न झालेले आणि अभिशोषण न झालेले टाकाऊ पदार्थ मल स्वरुपात गुदद्वाराद्वारे शरीराबाहेर टाकण्याची क्रिया म्हणजे मलविसर्जन होय.

52) यकृत

53) शाकाहारी, रवंथ करणारे प्राणी

54) रुमेन

55) गाय, बैल, हरीण, म्हैस, शेळी, मेंढी, जिराफ, इ.

56) अंधनाळ/अंधात्र

57)नाही. कारण मानवाच्या पचनसंस्थेत सेल्युलोजचे पचन करण्यासाठी आवश्यक इंद्रिय (भाग) नाही.

58) ज्या सजीवांना उघड्या डोळ्यांनी पाहता येत नाही; तसेच त्यांना फक्त सूक्ष्मदर्शक यंत्रातूनच पाहता येते ; त्यांना 'सूक्ष्मजीव' असे म्हणतात.

59)ज्या सजीवांचे शरीर फक्त एकाच पेशीचे बनलेले असते; त्यांना एकपेशीय सजीव म्हणतात.

60) अमिबामध्ये अन्नाचे पचन अन्नविवरामध्ये (रिक्तिकेमध्ये) होते.

61)जेव्हा गिरीष घाईने अन्न खातो तेंव्हा अन्नाचे कण श्वसनलिकेत जाऊ शकतात; ज्यामुळे हवेची व अन्नाची हालचाल योग्यरितीने न होण्यामुळे उचक्या लागतात.

62) सूक्ष्मदर्शक हे असे उपकरण आहे; ज्यामुळे उघड्या डोळ्यांनी पाहता न येणारे सूक्ष्मजीव व सूक्ष्म रचना मोठी करून पाहता येते.

III.दोन-तीन वाक्यात उत्तरे द्या (2 गुण)

63) प्राण्यांमधील पोषण ही अन्न घेणे, त्याचे पचन करणे व शरीरासाठी आवश्यक ऊर्जा व पोषकद्रव्ये मिळवण्याची प्रक्रिया आहे. पोषणाची 2 मुख्य उद्दिष्ट्ये आहेत.

(i) शरीराला ऊर्जा पुरवणे

(ii) शरीराच्या वाढीस व दुरुस्तीस मदत करणे.

64) पचन ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये प्राणी संकीर्ण अन्नघटकांना साध्या, विद्राव्य स्वरूपात रूपांतरित करतात.

प्राण्यांमधील पचनाचे टप्पे---अंतर्ग्रहण, पचन, अभिशोषण व मलविसर्जन.

65) काही प्राणी अर्धवट पचलेले अन्न लहान गोळ्यांमध्ये पुन्हा तोंडात आणून चघळतात. या प्रक्रियेला 'रवंथ करणे' म्हणतात. या प्रकारच्या प्राण्यांमध्ये अर्धवट पचलेले अन्न रुमेनमध्ये साठवले जाते.

66) जीभ आपल्याला बोलण्यास मदत करते. ती अन्न चाखण्यास, लाळेसोबत मिसळण्यास व गिळण्यास मदत करते. ती वेगवेगळ्या चवी ओळखण्यासही मदत करते.

67) अन्ननलिका, जठर, लहान आतडे, मोठे आतडे, गुदद्वार.


68) हे लहान आतड्याच्या आतील पृष्ठभागावर बोटांसारख्या रचना असलेले भाग आहेत. शोषणेंद्रिये पचलेल्या अन्नाचा रस शोषून घेण्यासाठी आपला आकार वाढवितात. अन्नातील पोषकद्रव्ये रक्तवाहिन्यांच्या सहाय्याने शरीरातील विविध अवयवांना पोहोचवण्याचे कार्य करतात.

69) (a) कार्बोहायड्रेट्स -ग्लुकोज (साखर)

(b) प्रोटीन्स - अमिनो आम्ल

(c) फॅट्स - फॅटी ॲसिड आणि ग्लिसरॉल

70) अमिबा आकृती



71) A) अमिबा

B) गाय

C) छद्मपाद

D) सेल्युलोज

E) दात

F) जीभ

G) हैड्रोक्लोरिक आम्ल.

H) यकृत


I) शोषणेंद्रिये

J) गुदव्दार


IV. तीन ते चार वाक्यात उत्तरे द्या.

72) शोषणेंद्रिये या बोटासारख्या रचना लहान आतड्याच्या आतील भागात असतात. ही शोषणेंद्रिये पचन झालेल्या अन्नातील पोषक द्रव्यांचे शोषण करण्यास मदत करतात. व रक्तवाहिन्यांच्या सहाय्याने शरीरातील विविध अवयवांना पोहोचवतात. त्यामुळे पोषणाची प्रक्रिया पूर्ण होते.

73) दातांचे प्रकार - आकृती व नांवे.




74) मानवी पचन संस्था आकृती व नांवे.



चित्र 2.2 मानवी पचनसंस्था

75) रवंथ करणाऱ्या प्राण्यांची पचनसंस्था – आकृती



76) अंतर्ग्रहण

↓

पचन

↓

अभिशोषण

↓

एकजीव होणे

↓

मलविसर्जन.

पाठ 3

उष्णता

I. वस्तुनिष्ठ प्रश्न

1 A. लोखंडाचा गोळा पाण्यावर तरंगतो

2. C तांबे डाग प्रतिरोधक आहे आणि पोलादापेक्षा चांगला विद्युत वाहक आहे.

3 .A गडद रंगाचे कपडे फिकट रंगाच्या कपड्यांपेक्षा अधिक उष्णता शोषून घेतात.

4. A तापमान

5. B प्रयोगशाळेचा तापमापक

6. C दोन्ही शरीरांचे तापमान सारखेच आहे.

7. C. कमी तापमान

8. C. पाणी

9. C. घराला आग लागण्यापासून वाचवण्यासाठी

10. C. इमारत थंड ठेवण्यासाठी

11 . B. प्रसरण (Expansion)

12 B. सभोवतालच्या भागातून तव्यामध्ये उष्णतेचे संक्रमण

13 . D. भांड्याच्या उष्णतेपासून हात वाचवण्यासाठी

14 B वहन (Conduction)

15. D. ॲल्युमिनियम

16 B. समुद्राच्या दिशेने येणारा वारा येण्यासाठी

17. B. समुद्राकडून जमिनीच्या दिशेने वाहणारा वारा

18. C. जमीन समुद्रापेक्षा जलद गरम होते

19. C. उत्सर्जन (Radiation)

20. B. अभिसरण (Convection)

21. C उत्सर्जन

22. C. उत्सर्जन

23 A. वरच्या दिशेने उष्ण तेचे अभिसरण

24. B अभिसरण

25. B . पोकळ वीट घर थंड ठेवते

26. B. पांढरा रंग सूर्यकिरण परावर्तित करतो व थंडावा राखतो

27 . B. लोकर शरीर गरम ठेवते

28. C. 1- अभिसरण, 2- वहन, 3- उत्सर्जन

29. B. तापमापक

30. B. वैद्यकीय तापमापक

31. B 35°C ते 42°C

32. A37°C

33. D. -10°C ते 110°C

34. B. पारदर्शक

35 .C. काच

36 A. डिग्री सेल्सिअस

37 D. -40°

38. D. 32°F

39. C) अल्कोहोल.

40. C) सूर्यापासून येणारी उष्णता.

41. B) हवा.

42. B) तापमापक.

43. C) त्वचा.

44 B. वहन (Conduction).

II जोड्या जुळवा:

45 .1- C, 2- A, 3- D, 4- B

46. 1- B,2- C, 3- D,4- A

47. डिग्री सेल्सियस (°C)

48. तापमान

49. तापमापक

50. उष्णतेचे संक्रमण   (Heat current)

51.उत्सर्जन (Radiation)

52.अभिसरण (Convection)

53. जमिनीवरील वारा (Land Breeze):

54. चांदी

IV. बरोबर/चूक:

55.चूक

56.बरोबर

57.चूक

58.चूक

V. दोन-तीन वाक्यांत उत्तरे द्या:

59. उष्णता संक्रमणाचे तीन प्रकार म्हणजे: उष्णता वहन (Heat conduction), उष्णता अभिसरण (Heat convection), आणि उष्णता उत्सर्जन (Heat radiation).

60. स्टील हा एक चांगला उष्णता वाहक आहे, त्यामुळे तो उष्णता सहजपणे वितरित करतो. पेपर कप हे उष्णता रोधक असल्यामुळे त्यामधून उष्णता कमी प्रमाणात जाते.


61. वैद्यकीय तापमापक 35°C ते 42°C पर्यंतचे तापमान मोजण्यासाठी वापरतात. प्रयोगशाळेत तापमान खूप जास्त असू शकते, त्यामुळे वैद्यकीय तापमापक प्रयोगशाळेतील वापरासाठी योग्य नाही.

62. वैद्यकीय तापमापक 35°C ते 42°C पर्यंतचे तापमान मोजतो, तर प्रयोगशाळेतील तापमापक -10°C ते 110°C पर्यंत मोजू शकतो.

63. पांढरा रंग प्रकाश आणि उष्णता परावर्तित करतो. त्यामुळे गरम भागात घराचे आतले तापमान कमी राहते. काळा रंग उष्णता शोषतो, त्यामुळे पांढरा रंग वापरल्यास तापमान काही प्रमाणात कमी करता येते.

VI. तीन-चार वाक्यांत उत्तरे द्या:

64. या तापमापकाला ला एक बारीक काच नळी असते. एका टोकाला पारा भरलेला काचगोळा असतो. बाहेर एक चमकणारी पा-याची पट्टी असते जी उष्णतेनुसार वर खाली सरकते आणि स्केलवरून तापमान दाखवते.



65. वैद्यकीय तापमापक चा वापर शरीराचे तापमान मोजण्यासाठी होतो. सामान्य तापमान 37°C किंवा 98.6°F असते. हा थर्मामीटर जीभेखाली किंवा बगलेखाली ठेवला जातो.

VII. चार-पाच वाक्यांत उत्तरे द्या:

66. उष्णतेचे वहन (Conduction): घन पदार्थांमध्ये उष्णतेचा प्रवाह. उदा.: धातूचा चमचा गरम होणे.

अभिसरण (Convection): द्रव आणि वायूंमध्ये उष्णतेचा प्रवाह. उदा.: गरम पाण्याचे वर चढणे.

उत्सर्जन (Radiation): माध्यमाशिवाय उष्णतेचा प्रवाह. उदा.: सूर्याची उष्णता पृथ्वीपर्यंत पोहोचणे.

67. उष्णता वाहक (Heat conductor): उष्णता चांगली वाहणारे पदार्थ. उदा.: धातू (तांबे, चांदी, कांस्य).

उष्णता रोधक (Heat insulator): उष्णता वाहण्यास अडथळा आणणारे पदार्थ. उदा.: लाकूड, प्लास्टिक, रबर.

68. उष्णता: उर्जेचा एक प्रकार, जी अशी ऊर्जा आहे जी तापमान कमी-जास्त होण्याच्या प्रक्रियेदरम्यान स्थानांतरित होऊ शकते. तापमान: एखाद्या वस्तूच्या गरमपणाची किंवा थंडपणाची पातळी.

उदाहरण: जर एका लहान भांडया मध्ये आणि एका मोठ्या भांड्यात समान तापमान असेल, तर मोठ्या भांड्यात अधिक उष्णता असेल.

69. वहन (Conduction): घन पदार्थांमध्ये उष्णतेचे स्थानांतरण.

उदाहरण: आगीत ठेवलेला धातूचा चमचा गरम होणे.

अभिसरण (Convection): द्रवपदार्थ आणि वायूंमध्ये उष्णतेचे स्थानांतरण.

उदाहरण: उकळत्या पाण्यात गरम पाणी वर येणे.

उत्सर्जन (Radiation): माध्यमाशिवाय उष्णतेचे स्थानांतरण.

उदाहरण: सूर्याची उष्णता पृथ्वीपर्यंत पोहोचणे.

घटक – 4
आम्ले, अल्कली आणि क्षार

1. D हैड्रोक्लोरिक आम्ल

2. A दगडफूल

3. B कडू

4. C फिनोल्पथॅलीन

5. C व्हिनेगर

6. C A आणि B दोन्ही

7. B गडद गुलाबी आणि हिरवा

8. D हैड्रोक्लोरिक आम्ल

9. B A-४ B-३ C-२ D-१

10. A मॅग्नेशियमची निवळी अल्कली आहे

11. C सोडियम बायकार्बोनेट

12. A क्षार आणि पाणी

13. D साबणाचे द्रावण

14. D. त्यांच्यात स्फटिकासारखे गुणधर्म आहेत

15. A. H_2O

16. D १ आणि ३ फक्त

18. B. खिडकी स्वच्छके

19. C. चुनखडी

20. C अ आणि ब दोन्ही वापरता येतात

21. A. आम्लता वाढते.

22. A निळा होतो.

23 B. उदासिनीकरण

24 . D. फॉर्मिक आम्ल

25. B लाल

26. A लाल

27. C. आम्ल + अल्कली

28. C चूनखडी

29. A लिटमस

30. A.ओएच‾ (OH^-)

31. C फिनोल्फ्थॅलीन

32. D उष्णता मुक्त होते

II.रिकाम्या जागा भरा:

33. सिट्रिक आम्ल

34. नैसर्गिक

35. अल्कली

36. टार्टारिक आम्ल

37. क्षार

38. दगडफूल

39. फिकट पिवळा

40. सोडियम क्लोराईड

41. लाल

42. व्हिटॅमिन सी

III.खालील जोड्या जुळवा:

43. 1 – iii, 2 – i, 3 – iv, 4 – ii

44. 1– ii, 2– iv, 3– i, 4– v, 5– iii

45. 1– iv, 2– iii, 3– i, 4– v, 5– ii

IV. चूक की बरोबर ओळखा, आणि चूकीची विधाने बरोबर करून लिहा:

46. चूक – नळाचे पाणी उदासीन असते.

47. बरोबर

48. चूक– उदासिनीकरण ही आम्ल आणि अल्कलीतील क्रियाआहे.

49. चूक– चुन्याच्यानिवळीत लाल लिटमस निळा होतो.

50. चूक – हळद हे एक नैसर्गिक सूचक आहे.

51. चूक– सामान्य मीठ हे क्षार आहे.

52. चूक– आम्लीय पावसात सल्फ्युरिक आणि नैट्रिक आम्ल असते .

53. चूक– दह्यामध्ये लॅक्टिक आम्ल असते.

54. चूक - रासायनिक खतांचा अती वापर केल्याने मातीची आम्लता वाढते.

55. चूक – ॲस्कॉर्बिक आम्ल व्हिटॅमिन- सीचा स्रोत म्हणून वापरता येते .

V.एका शब्दात किंवा एका वाक्यात उत्तरे:

56. पिवळ्या रंगाचे सूचक

57.HCl

58. आम्लीय पदार्थ

59. सोडियम क्लोराईड

60. दगडफूल

61. अल्कली

62. ॲसिटिक आम्ल

63. कॅल्शियम हैपोक्लोराइट

64. कॅल्शियम हैड्रॉक्साइड

VI. दोन-तीन वाक्यात उत्तरे:

65. आम्ल आणि अल्कलींच्या संयोगाने क्षार तयार होतात. उदा.: $HCl + NaOH \rightarrow NaCl + H_2O$

66. एखादा पदार्थ आम्लधर्मी अथवा अल्कधर्मी आहे हे तपासण्यासाठी विशिष्ट पदार्थांचा वापर केला जातो अशा पदार्थांना सूचके असे म्हणतात. उदा.: लिटमस, हळद.

67. आम्लांमध्ये H^+असते; क्षारांमध्ये OH^-असते.

आम्ले चवीला आंबट तर अल्कली कडू असतात.

68. लिटमस, हळद.

